दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
SAMARTH RAJYOG
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२८० शुक्रवार दि.१९ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-280 Friday, Dt.19 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बंडखोर खासदारांना वाय+ सुरक्षा

## संजय राऊतांच्या वक्तव्यानंतर निर्णयाची चर्चा

बीड : प्रतिनिधी

राज्यातील राजकारणात काल मोठा भूकंप झाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील ९ खासदारांपैकी ६ खासदारांनी पक्ष सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होण्याचा निर्णय घेतला. या गटाफुटीनंतर राज्यात एकच खळबळ उडाली. यानंतर मात्र संजय राऊत यांनी फुटलेल्या खासदारांना कार्यकर्त्यांना फोडून काढण्याचे आदेश दिले आणि परभणी, वाशिम, बीडमध्ये कार्यकर्ते आक्रमक झाले. दरम्यान उबाठा सेनेतून फुटलेल्या त्या ६ खासदारांना आता 'वाय प्लस' सुरक्षा देण्यात आली आहे. या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.



परभणीचे खासदार संजय जाधव यांनी स्वतंत्र भूमिका घेतल्यानंतर परभणी जिल्ह्यातील ठाकरे समर्थक शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. सोनपेठ येथे शिवसैनिकांनी संजय जाधव यांच्या प्रतिमेला चपलांचा हार घालत निषेध नोंदवला. तसेच त्यांच्या प्रतिमेची प्रतीकात्मक अन्त्ययात्रा काढून छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी 'उद्धव ठाकरे आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं' आणि 'गद्दारांचा निषेध असो'अशा घोषणा देण्यात आल्या.

बीडमध्येही ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी सहा खासदारांचे प्रतीकात्मक पुतळे जाळून संताप व्यक्त केला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी संबंधित खासदारांविरोधात तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत इशाराही दिला. वाशिममध्ये यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्या प्रतिमेला काळे फासून आणि जोडे मारून आंदोलन करण्यात आले. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत खासदारांच्या निर्णयाचा निषेध नोंदवला.विशेष म्हणजे, काही वेळापूर्वीच खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते की, आमच्या पक्षाचे खासदार-आमदार तोडणार असे म्हणणा-या लोकांना वाटते एकदा पक्षाचे दोन तुकडे केले आता पुन्हा करू. त्यांना मी सांगतो आता जर पक्ष फोडला तर तुम्हाला तोडू नाहीतर बाळासाहेब ठाकरेंचे कार्यकर्ते म्हणून घेणार नाही.

राज्यातील राजकारणात काल मोठा भूकंप झाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील ९ खासदारांपैकी ६ खासदारांनी पक्ष सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होण्याचा निर्णय घेतला. या गटाफुटीनंतर राज्यात एकच खळबळ उडाली. यानंतर मात्र संजय राऊत यांनी फुटलेल्या खासदारांना कार्यकर्त्यांना फोडून काढण्याचे आदेश दिले आणि परभणी, वाशिम, बीडमध्ये कार्यकर्ते आक्रमक झाले.

# ग्राहकांना प्रीपेड मीटर बंधनकारक नाही; महावितरणचा मोठा खुलासा

नागपूर : प्रतिनिधी

राज्यामध्ये प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटरला जोरदार विरोध केला जात असताना महावितरण कंपनीने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये नागरिकांना दिलासा देणारा खुलासा केला. सध्या प्रीपेड मीटर कोणत्याही ग्राहकांना बंधनकारक करण्यात आले नाही, असे महावितरणने सांगितले. तसेच, ग्राहकांनी मागणी केली, तरच त्यांना प्रीपेड मीटर दिले जाईल, अशी माहिती दिली.

प्रीपेड मीटरविरोधात विदर्भ वीज ग्राहक संघटनेच्या वतीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली. ग्राहकांना प्रीपेड मीटर देण्याचा निर्णय मनमानी स्वरूपाचा आहे, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी आवश्यक अभ्यास करण्यात आला नाही. यासंदर्भात कोणताही अहवाल नाही.



प्रीपेड मीटरचा रिचार्ज संपल्यानंतर वीज पुरवठा आपोआप बंद होईल. रिचार्ज करण्याची तलवार सतत डोक्यावर राहील. ऑनलाईन व्यवहार करणे सर्वांना शक्य नाही. प्रत्येकाकडे स्मार्ट फोन नाहीत. या निर्णयामुळे मीटर रीडिंग व वीज बिल वितरित करणा-या कर्मचा-यांच्या नोक-याही जातील, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. महावितरणने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून हे सर्व आरोप फेटाळले आहेत.

पान २ वर...

# केज मधील विशाल डेअरीवर एफडीएची मोठी कारवाई

## ६ लाख ६८ हजार ४०९ रुपयांचा भेसळ युक्त पदार्थांचा साठा जप्त

मस्साजोग / अनंत जाधव

राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाच्या भेसळविरोधी मोहिमेला अधिक गती मिळत असून विविध खाद्यपदार्थांसह दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेची

पान २ वर...





## पेठ बीड पोलीसांनी गांधीनगर भागात गांजा विकणा-या महीलेला केली अटक

बीड /प्रतिनिधी

दिनांक १६/०६/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक निलेश केळे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, गांधीनगर भागात राहत असलेली महीला नामे कमलबाई राधाकिसन खंडागळे वय ७० वर्षे रा. गांधीनगर ही झाडु बनवण्याचा व्यवसाय करत असुन त्याच झाडुच्या आडुन वयात येणा-या तरुण मुलांना गांजा पिण्याच्या नशेच्या विळख्यात ढकलत आहे. अशी बातमी मिळाल्याबरोबर पोलीस स्टेशनचा

पान २ वर...

# मातोश्रीशी गद्दारी करणा-या खासदारांना बीड जिल्ह्यात तुडवणार - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड /प्रतिनीधी

आज दिल्ली येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची संसदीय दलाची बैठक गटनेते खा.अरविंद सावंत यांनी व्हिप बजाऊन बोलावली होती.

सदरील बैठकीस हे गद्दार खासदार हजेरी लावतात का नाही याची प्रतिक्षा बीड जिल्हा शिवसैनिक करीत होते. ठीक ११.३० वाजेपर्यंत सदर बैठकीत गद्दार सहा खासदारांपैकी एकही खासदार उपस्थित नसल्याचे समजताच शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात व बीड तालुकाप्रमुख गोरख आण्णा शिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, शिवसहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव सर, युवासेना तालुकाप्रमुख बारीकराव येवले यांच्या प्रमुख उपस्थितीत या गद्दार सहा खासदारांचे प्रतिकात्मक दहन करून त्यांचा जोरदार निषेध नोंदवण्यात आला.



यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर म्हणाले की, ज्या विश्वासाने व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या विचारांशी बांधिल राहुन तसेच हजारो शिवसैनिकांच्या मेहनतीच्या बळावर व लाखो जनतेच्या मतदानरूपी आशिर्वादावर हे सहा गद्दार निवडुन गेले होते. या सर्वांशी त्यांनी आज घात केला आहे. भविष्यात मतदार जनता

पान २ वर...




## ठेवेदाराची फसवणूक प्रकरणी

# मुक्ताई अर्बनचे शिवप्रसाद सक्राते यांच्यासह १७ जणांवर आणखी एक गुन्हा दाखल

माजलगाव प्रतिनिधी

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात बंधने मुक्ताई अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीशी संबंधित प्रकरणात संस्थेचे अध्यक्ष शिवप्रसाद सक्राते यांच्यासह १७ जणांविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठेवीदारांची फसवणूक, विश्वासघात, बनावट आश्वासने देऊन आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियमांतर्गत हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित संस्थेने आकर्षक व्याजदर, सुरक्षित गुंतवणूक व मुदतपूर्तीनंतर रक्कम परत देण्याचे आश्वासन देत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या होत्या. मात्र मुदत संपूनही ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळाली नसल्याने अनेक गुंतवणूकदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

पान २ वर...



# शेवटगोडझाला... चेक हातात घेऊनच परत

माजलगाव / प्रतिनिधी

केदारेश्वर साखर कारखान्याकडील थकीत ऊस बिलाच्या प्रश्नावर युवा शेतकरी संघर्ष समितीने पश्चिम महाराष्ट्रात धडक मोर्चा काढत शेतक-यांचा आवाज बुलंद केला. आंदोलनाची दखल घेत कारखाना प्रशासनाने तत्काळ शेतक-यांच्या खात्यावर ऊस बिलाची रक्कम वर्ग करण्यास सुरुवात केली.

स्टेट बँकेत खाते असलेल्या अनेक शेतक-यांच्या खात्यावर पैसे जमा झाले असून त्यांना मोबाईलवर मेसेजही प्राप्त झाले

पान २ वर...



पश्चिम महाराष्ट्रात युवा शेतकरी संघर्ष समितीचा दणका, आंदोलनाला मोठे यश.!



संपादकीय....

## पक्ष फोडणाऱ्यांना रस्त्यावर तोडा..!

ठाकरे यांच्या आक्रमक आवाहनाने महाराष्ट्राच्या राजकारणात नवा भूचाल

बीड - महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतर, फुटीरता आणि सत्तेसाठी होणारी राजकीय पुनर्रचना ही नवीन बाब राहिलेली नाही. मात्र एखाद्या पक्षाच्या अस्तित्वालाच आव्हान देणाऱ्या घडामोडी घडत असताना त्या पक्षाच्या नेतृत्वाकडून उमटणारी प्रतिक्रिया किती तीव्र असू शकते, याचा प्रत्यय शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अलीकडील वक्तव्यातून आला आहे. पक्ष फोडणाऱ्यांना रस्त्यावर तोडा या शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांना दिलेले आवाहन केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय वास्तववावरील तीव्र संतापाची अभिव्यक्ती मानली जात आहे.

अलीकडील काळात ठाकरे गटातील अनेक नेते, आमदार, खासदार आणि पदाधिकारी यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. विशेषतः लोकसभा निवडणुकांनंतर पक्षातील काही खासदार आणि वरिष्ठ नेत्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता उघडपणे समोर येऊ लागली आहे. पक्षातील संघटनात्मक प्रश्न, निवडणूक धोरणे, नेतृत्वाविषयीचे मतभेद आणि भविष्यातील राजकीय समीकरणे यामुळे अनेक जण वेगळा मार्ग स्वीकारत असल्याचे चित्र दिसत आहे.

राजकीय पक्षांची ताकद केवळ त्यांच्या चिन्हात किंवा कार्यालयात नसते; ती त्यांच्या विचारसरणीत, कार्यकर्त्यांच्या निष्ठेत आणि जनाधारात असते. शिवसेनेच्या इतिहासात अनेकदा फुटी झाल्या, पण २०२२ नंतर झालेल्या घटनांनी पक्षाच्या मूळ संरचनेलाच मोठा धक्का दिला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडानंतर पक्षाचे चिन्ह आणि नाव गमावण्याची वेळ ठाकरे गटावर आली. त्यानंतरही पक्षातून होणारी गळती थांबलेली नाही.

अशा पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांची भाषा अधिक आक्रमक होणे स्वाभाविक असले तरी लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही राजकीय संघर्षाची मर्यादा संविधान आणि कायद्याच्या चौकटीतच असली पाहिजे. रस्त्यावर तोडा या विधानाचा राजकीय अर्थ संघटनात्मक प्रतिकार, लोकशाही मार्गाने विरोध आणि जनतेसमोर सत्य मांडणे असा घेतला जाऊ शकतो; मात्र त्याचा हिंसात्मक अर्थ काढला गेला तर तो लोकशाहीसाठी घातक ठरू शकतो.

या प्रकरणाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. एखाद्या पक्षातून सतत नेते बाहेर पडत असतील तर त्यामागील कारणांचा शोध घेणे नेतृत्वासाठी आवश्यक असते. केवळ पक्षत्याग करणाऱ्यांवर टीका करून समस्या सुटत नाही. पक्षातील संवाद, निर्णयप्रक्रिया, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि भविष्यातील स्पष्ट राजकीय दिशा यांचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज असते.

आज महाराष्ट्रातील मतदारही या घडामोडींकडे बारकाईने पाहत आहेत. पक्षांतर करणारे नेते असोत किंवा पक्ष टिकवण्यासाठी संघर्ष करणारे नेतृत्व असो, अंतिम निर्णय मतदारांच्या न्यायालयातच होणार आहे. जनतेला स्थिरता, विकास आणि विश्वासार्ह नेतृत्व अपेक्षित आहे. त्यामुळे भावनिक घोषणांपेक्षा जनहिताच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणाऱ्यांनाच लोकांचा कौल मिळेल.

उद्धव ठाकरे यांचे वक्तव्य हे त्यांच्या पक्षाच्या अस्तित्वासाठी सुरू असलेल्या संघर्षाचे प्रतीक आहे. मात्र या संघर्षातून महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणती दिशा मिळणार, पक्षनिष्ठा आणि विचारधारा यांना किती महत्त्व उरणार आणि सत्तेसाठी होणाऱ्या राजकीय स्थलांतरांना जनता कसा प्रतिसाद देणार, याची उत्तरे आगामी काळात मिळतील.

# एल निनो, उशिरा मान्सून आणि पाणीटंचाईचे संकट : आजची सावधगिरीच उद्याचे संरक्षण

यंदाचा पावसाळा अपेक्षेपेक्षा उशिरा सुरू झाला आहे. जून महिना अर्धा संपत आला तरी राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. तलाव, धरणे, विहिरी आणि भूजल पातळी यांवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. हवामान तज्ज्ञांनी एल निनो या जागतिक हवामान घटनेचा प्रभाव यंदाच्या मान्सूनवर पडू शकतो, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिक, शेतकरी आणि प्रशासन यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

भारताची अर्थव्यवस्था आणि विशेषतः महाराष्ट्रातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. पावसात खंड पडला किंवा पाऊस कमी झाला तर त्याचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही, तर पिण्याचे पाणी, वीज निर्मिती, उद्योग, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांवरही होतो. त्यामुळे एल निनो आणि त्याच्या संभाव्य परिणामांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

एल निनो, हवामान बदल आणि उशिरा होणारा मान्सून ही केवळ वैज्ञानिक किंवा पर्यावरणीय चर्चा नाही. हा विषय प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशी आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या भविष्याशी संबंधित आहे. आज आपण पाणी जपले, जलसंधारणाला प्राधान्य दिले आणि आधुनिक शेती पद्धती स्वीकारल्या तर उद्याचे संकट मोठ्या प्रमाणात टाळता येईल.

निसर्ग आपल्याला इशारा देत आहे. हा इशारा वेळेत ओळखून योग्य पावले उचलणे हीच खरी शहाणपणाची गोष्ट आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया, जलसंधारणाची चळवळ उभी करूया आणि भावी पिढ्यांसाठी जलसमृद्ध महाराष्ट्र घडवूया.

एल निनो म्हणजे नेमके काय?

प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय भागातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा जास्त वाढल्यास एल निनो ही हवामान घटना निर्माण होते. या बदलामुळे जगभरातील वाऱ्यांचे आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. भारतात याचा परिणाम प्रामुख्याने मान्सूनवर होतो. अनेकदा पाऊस उशिरा सुरू होतो, कमी प्रमाणात पडतो किंवा पावसाचे वितरण असमान होते.

हवामान बदलाच्या वाढत्या प्रभावामुळे एल निनोची तीव्रता अधिक जाणवत आहे. त्यामुळे दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, पाण्याची टंचाई आणि शेती उत्पादनात घट यांसारख्या समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो.

पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा

पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून जीवनाचा आधार आहे. महाराष्ट्राने यापूर्वी अनेक दुष्काळी वर्षे अनुभवली आहेत. टँकरवर अवलंबून असलेली गावे, कोरड्या पडलेल्या विहिरी आणि पाण्यासाठी होणारी भटकंती आजही अनेकांच्या स्मरणात आहे.

अशा परिस्थितीत पाणी बचतीचा विषय केवळ शासनाचा किंवा प्रशासनाचा न राहता प्रत्येक नागरिकाच्या जीवनशैलीचा भाग बनणे आवश्यक आहे. घरातील गळके नळ दुरुस्त करणे, वाहन धुण्यासाठी पाण्याचा अपव्यय टाळणे, शॉवरचा मर्यादित वापर करणे, पावसाचे पाणी साठवणे आणि पुनर्वापराला प्राधान्य देणे या छोट्या वाटणाऱ्या सवयी भविष्यात मोठा फरक घडवू शकतात.

आज एका कुटुंबाने दररोज ५० लिटर पाणी वाचवले, तर वर्षभरात हजारो लिटर पाणी बचत होऊ शकते. हीच बचत उद्याच्या पाणीटंचाईत महत्त्वाची ठरणार आहे.

शेतकऱ्यांसमोरील मोठे आव्हान

एल निनोचा सर्वाधिक परिणाम शेती क्षेत्रावर होण्याची शक्यता असते. महाराष्ट्रातील लाखो शेतकरी अजूनही पावसाच्या भरोशावर शेती करतात. पावसात खंड पडल्यास पेरण्या उशिरा होतात, बियाण्यांचे नुकसान होते आणि उत्पादन घटते.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करणे गरजेचे आहे. हवामान अंदाजाच्या आधारे पीक नियोजन करणे, कमी कालावधीत येणाऱ्या आणि दुष्काळ सहन करणाऱ्या वाणांची निवड करणे, ठिबक व तुषार सिंचनाचा वापर वाढविणे आणि मल्चिंगसारख्या तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी एकाच पिकावर अवलंबून न राहता पीक विविधीकरणाचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कडधान्ये, तेलबिया, फळबाग आणि भाजीपाला यांचा समावेश केल्यास जोखीम कमी करता येते.

जलसंधारण हा दीर्घकालीन उपाय

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना आता लोकचळवळ बनणे आवश्यक आहे. शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, वृक्षारोपण आणि जलयुक्त शिवारसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली तर भविष्यातील पाणी संकट मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

प्रत्येक गावाने आपला जलसंधारण आराखडा तयार करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत, शेतकरी, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे काम केल्यास भूजल पातळी वाढविणे शक्य आहे.

तंत्रज्ञानाचा वाढता उपयोग

आजच्या काळात शेती केवळ पावसावर अवलंबून राहिलेली नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, डिजिटल नोंदी, हवामान अंदाज आणि मोबाईल ॲप्स यांच्या मदतीने शेतकऱ्यांना अचूक माहिती मिळू लागली आहे.

महाविस्तार, क्रॉपसॅप, ॲग्रीस्टॅक यांसारख्या उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, बाजारभाव, हवामान अंदाज आणि शासकीय योजनांची माहिती सहज उपलब्ध होत आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांचे प्रभावी शस्त्र ठरू शकते.

शासन आणि समाजाची संयुक्त जबाबदारी

पाणी संकटावर मात करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज यांच्यात समन्वय आवश्यक आहे. शासनाने जलसंधारण, सिंचन आणि शेतकरी सहाय्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा संकल्प केला पाहिजे.

पाणी वाचविणे ही केवळ आर्थिक गरज नाही, तर सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे. भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित जलस्रोत उपलब्ध करून देण्यासाठी आजच कृती करणे आवश्यक आहे.

राजू हौसाबाई हिरामण धोत्रे
माजी सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# उद्योग, समाजकारण आणि नेतृत्वाचा प्रेरणादायी चेहरा इंजिनियर प्रविण वारे

आष्टी - समाजात काही व्यक्ती अशा असतात की त्यांचे कार्य केवळ त्यांच्या नावापुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण परिसरासाठी प्रेरणेचे केंद्र बनते. आपल्या जिद्दीच्या, परिश्रमाच्या, दूरदृष्टीच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर सामान्य कुटुंबातून असामान्य यश मिळवणाऱ्या व्यक्तींमध्ये बेलगाव (ता. आष्टी) येथील युवा उद्योजक श्री. इंजि. प्रविण वारे यांचे नाव आज आदराने घेतले जाते. उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, रोजगारनिर्मितीतील योगदान, सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग आणि ग्रामीण विकासासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न यांची दखल घेत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने त्यांची महाराष्ट्र आयकॉन २०२६ उद्योग सामाजिक पुरस्कार साठी निवड केली आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून ग्रामीण भागातील संघर्ष, जिद्द, कर्तृत्व आणि समाजनिष्ठेचा सन्मान मानला जात आहे.



आजच्या स्पर्धेच्या युगात यश मिळविण्यासाठी केवळ स्वप्ने पाहून चालत नाही; त्यासाठी प्रचंड मेहनत, चिकाटी आणि संकटांशी दोन हात करण्याची तयारी आवश्यक असते. श्री. इंजि. प्रविण वारे यांच्या आयुष्याचा प्रवास हा याच तत्त्वांचा जिवंत आदर्श आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या श्री. प्रविण वारे यांनी बालपणापासूनच कष्टाचे महत्त्व जाणले. ग्रामीण भागातील मर्यादित साधनसामग्री, आर्थिक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थिती यांचा सामना करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाच्या बळावर स्वतःचे आणि कुटुंबाचे भविष्य बदलण्याचा निर्धार त्यांनी केला आणि त्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले.

अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनेकांप्रमाणे नोकरीच्या मागे धावण्याऐवजी त्यांनी स्वतः काहीतरी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सोपा नव्हता. उद्योजकतेच्या मार्गावर असंख्य आव्हाने, आर्थिक जोखीम आणि अनिश्चितता होती. मात्र स्वतःवर असलेला विश्वास आणि मेहनतीची तयारी यामुळे त्यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यातूनच रेणुकाई कन्स्ट्रक्शन कंपनीची स्थापना झाली. सुरुवातीला लहान स्वरूपात सुरू झालेला हा उद्योग आज विश्वास, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. बांधकाम क्षेत्रात काम करताना त्यांनी गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले. कोणतेही काम असो, ते वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याची त्यांची कार्यशैली ग्राहकांचा विश्वास जिंकणारी ठरली. उद्योगातील वाढत्या स्पर्धेतही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. व्यवसायातील यशामुळे त्यांना आर्थिक प्रगती मिळाली; परंतु त्यांनी यशाचा अर्थ केवळ स्वतःच्या प्रगतीपुरता मर्यादित ठेवला नाही. समाजातील इतरांना संधी मिळाली पाहिजे, रोजगार उपलब्ध झाला पाहिजे आणि गावातील युवक सक्षम झाले पाहिजेत, हा त्यांचा विचार कायम राहिला.

रेणुकाई कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून त्यांनी अनेक युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला. अनेक कुटुंबांच्या घरातील चूल त्यांच्या उद्योगामुळे पेटती राहिली. बेरोजगारीच्या समस्येने त्रस्त असलेल्या ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे हीदेखील एक प्रकारची समाजसेवा आहे आणि श्री. इंजि. प्रविण वारे यांनी ही सेवा सातत्याने केली आहे. अनेक तरुणांना कामाची संधी, अनुभव आणि आत्मविश्वास देऊन त्यांनी त्यांचे जीवन घडविण्यात हातभार लावला.

उद्योग क्षेत्रातील यशाबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. सामाजिक जाणीव असलेला उद्योजक म्हणून त्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. गावातील धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, गरजूंची मदत, आरोग्यविषयक शिबिरे आणि युवकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम यांना त्यांनी नेहमीच सहकार्य केले. एखाद्या कुटुंबावर संकट आले तर मदतीसाठी धावून जाणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे, सामाजिक संस्थांच्या उपक्रमांना हातभार लावणे ही त्यांची कार्यपद्धतीच बनली आहे.

बेलगाव गावाच्या विकासासाठी त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे आहे. गावातील विकासकामे, सार्वजनिक सुविधा, धार्मिक स्थळांचे संवर्धन, सामाजिक सलोखा आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. गावाच्या विकासासाठी केवळ प्रशासनाकडे बोट न दाखवता स्वतः पुढाकार घेण्याची त्यांची वृत्ती ग्रामस्थांना प्रेरणा देणारी ठरली आहे. त्यामुळेच गावातील युवकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरांतील लोक त्यांच्याविषयी आदर व्यक्त करतात.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे नेतृत्व. नेतृत्व म्हणजे केवळ पद किंवा अधिकार नव्हे, तर लोकांना सोबत घेऊन पुढे जाण्याची क्षमता होय. श्री. इंजि. प्रविण वारे यांच्याकडे ही क्षमता नैसर्गिकरित्या आहे. ते सर्वसामान्य लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधतात. त्यामुळेच त्यांच्या सभोवती विश्वासाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आजच्या काळात समाजाला अशा व्यक्तिमत्त्वांची गरज आहे, जी उद्योग क्षेत्रात प्रगती करताना समाजालाही सोबत घेऊन जातात. श्री. इंजि. प्रविण वारे यांचे कार्य हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी उद्योग, समाजकारण, नेतृत्व आणि विकास या सर्व क्षेत्रांमध्ये समतोल साधत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यातून युवकांना प्रेरणा, समाजाला दिशा आणि विकासाला गती मिळत आहे.

म्हणूनच महाराष्ट्र आयकॉन २०२६ उद्योग सामाजिक पुरस्कार हा सन्मान त्यांच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण बेलगाव गावासाठी, आष्टी तालुक्यासाठी आणि ग्रामीण महाराष्ट्रातील कर्तृत्ववान युवकांसाठी अभिमानाचा क्षण आहे. हा पुरस्कार त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव तर आहेच; परंतु भविष्यात आणखी मोठ्या सामाजिक आणि औद्योगिक योगदानाची नांदीही आहे.

यशाच्या शिखरावर पोहोचूनही जमिनीशी नाळ जपणारा, उद्योगात प्रगती करताना समाजाची जबाबदारी विसरून न जाणारा आणि स्वतःबरोबर इतरांनाही पुढे घेऊन जाणारा हा तरुण उद्योजक भविष्यात आणखी मोठी भरारी घेईल, असा विश्वास सर्व स्तरांतून व्यक्त केला जात आहे. संघर्षातून उभे राहून समाजासाठी जगण्याचा संदेश देणारे श्री. इंजि. प्रविण वारे हे आजच्या युवा पिढीसमोर उभे असलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा प्रवास हा केवळ यशाचा नाही, तर मूल्यांचा, समाजनिष्ठेचा आणि कर्तृत्वाचा सुवर्णअध्याय आहे.

शब्दांकन...
**- राजेंद्र लाड,आष्टी**
(९४२३१७०८८५)

पान १ वरून...

**केज मधील विशाल ...**

तपासणी करण्यासाठी प्रशासनाकडून धडक कारवाया सुरू आहेत.या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने (ऋऊ-) केज येथील उमरी रोड वरील विशाल डेअरीच्या मिठाई उत्पादन केंद्रावर धाड टाकून धडक कारवाई केल्याची घटना उघडकीस आली आहे.या कारवाईमुळे परिसरातील पान टपऱ्या धारकांमध्ये आणि भेंसळखोरांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होऊन एकच खळबळ उडाली आहे.

अन्न औषध प्रशासनाकडून धडक कारवाई करत अस्वच्छ व आरोग्यास अपायकारक परिस्थितीत तयार करण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा सुमारे ६ लाख ६८ हजार ४०९ रुपयांचा साठा जप्त केला आहे. तसेच संबंधित उत्पादन केंद्राचा परवाना पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त डॉ. तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार १७ जून रोजी ही तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान संबंधित उत्पादन केंद्रात अत्यंत अस्वच्छ वातावरणात हलवा, कलाकंद आणि इतर खाद्यपदार्थ तयार केले जात असल्याचे आढळून आले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई केली. कारवाईदरम्यान खाद्यपदार्थांचे नमुने घेण्यात आले. हे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच आयुक्त तुकाराम मुंडे हे मूळचे बीड जिल्ह्यातील रहिवासी असल्यामुळे.त्यांनी संपूर्ण राज्यात जी कडक शिस्त लावली आहे, तीच शिस्त आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी आता ते स्वतःच्या जिल्ह्यातही घेत आहेत. मुंढे साहेब आता बीड जिल्ह्यावरही बारीक लक्ष देत आहे, अशी चर्चा सध्या संपूर्ण जिल्ह्यात सुरू असल्याने या कारवाईचे जिल्ह्यातील नागरिकांकडून मुंडे यांचे कौतुक होत आहे.

**ग्राहकांना प्रीपेड....**

ग्राहकांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह

न्यायालयाने ग्राहकांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्राहकांना स्मार्ट मीटर नाकारण्याचा अधिकार आहे का किंवा स्मार्ट मीटर लावण्यासाठी ग्राहकांची परवानगी घेणे आवश्यक आहे, अशी कोठे तरतूद आहे का, असे प्रश्न न्यायालयाने याचिकाकर्त्याला विचारले आणि यावर येत्या सोमवारी उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. निराधारपणे विरोध करणे याचिकाकर्त्याच्या हिताचे होणार नाही, असा इशाराही दिला.

**मातोश्रीशी गद्दारी ....**

यांना माफ करणार नाही. या सहा खासदारांपैकी जो गद्दार बीड जिल्ह्यात दिसेल त्याला आम्ही तुडवल्या शिवाय राहणार नाही.

यावेळी शिवसेना जिंदाबाद, बाळासाहेब ठाकरेंचा विजय असो, उद्धवसाहेब तुम

पान १ वरून...

आगे बढो हम तुम्हारे साथ है, जय भवानी जय शिवराय, अशा गगनभेदी घोषणांनी परीसर दणानुन गेला

या निषेध आंदोलनात उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सचिव नंदु येवले, उपतालुकाप्रमुख नितीन नवले,तालुकासहसचिव संदिप भानप, युवानेते मुकेश घुमरे, बाबु सिरसाट, महादेव जोगदंड, मगर मामा, अशोक खांडे, समाधान हिंगणे, आकाश घोरपडे, सुनिल इंगळे, भैय्या घोरपड, बाबु कुटे यांच्यासह शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पेठ बीड पोलीसांनी ....**

नव्यानेच चार्ज घेतलेले पोलीस निरीक्षक यांनी पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना विश्वासात घेवुन अत्यंत गोपनीय सापळा लावुन सदर महीलेच्या राहते घरी छापा मारला असता झाडु बनवण्याच्या शिंदळीच्या खाली घरामध्ये ६.०७४ किलोग्रॅम गांजा किंमती ३६४४४ रुपयाचा गांजा मिळुन आल्याने तो गांजा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा करुन सदर महीलेला महीला पोलीस अंमलदार यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन पोलीस ठाणे पेठ बीड येथे आणुन सदर महीलेविरुदध सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद दिली आहे.

त्यानुसार पोस्टेला सदर महीलेविरुदध गु.र.नं. १९४/२०२६ कलम ८ (क), २० (ब),ii (ब) NDPS act प्रमाणे गुन्हा दाखल करुन तिला सदर गुन्हयात अटक करुन तिला मा. न्यायालयापुढे हजर करुन तिची पोलीस कोठडी घेतली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही पोलिस अधिक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, प्र. पोलिस अधिक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक मा. श्री. समीर शेख, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. वेंकटराम भा.पो.से यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहा. पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे, पोहेकॉ/१३५३ सुभाष मोठे, पोहेकॉ / १८०३ नितीन राठोड, पोह/५५९ उगले, पोह/१०६५ माने, महीला पोलीस हवालदार रंजना सांगळे, रेश्मा जाधव, पोअं/१७८ बहीर, पोअं. /२२१८ विष्णु गुजर, पोअं. /१९८७ औदुंबर गिरी, पोअं./१५५१ पांडुरंग परजने यांनी केली आहे.

**मुक्ताई अर्बनचे शिवप्रसाद...**

तपासादरम्यान संस्थेच्या विविध शाखांमधील आर्थिक व्यवहार, कागदपत्रे आणि ठेवीदारांच्या तक्रारींची छाननी करण्यात आली. प्राथमिक चौकशीत ठेवीदारांची दिशाभूल करून निधी उभारण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याने संबंधित पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यापूर्वीही संस्थेविरोधात अनेक तक्रारी दाखल झाल्या असून, आता नव्याने दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे संस्थेच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.

पान १ वरून...

पोलीसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात शिवप्रसाद सक्राते यांच्यासह एकूण १७ जणांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या सर्वांवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील फसवणूक, विश्वासघात, आर्थिक गैरव्यवहार आणि ठेवीदारांची फसवणूक यासंदर्भातील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ३ व ४ चाही समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, अनेक ठेवीदारांनी आपल्या आयुष्यभराची बचत संस्थेत गुंतविल्याचा दावा केला आहे. काहींनी मुलांच्या शिक्षणासाठी, तर काहींनी शेती व व्यवसायासाठी राखून ठेवलेली रक्कम या संस्थेत ठेवली होती. परंतु रक्कम परत न मिळाल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणाचा तपास माजलगाव शहर पोलीस करत असून, आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. संबंधित आरोपींच्या मालमत्तेचा तपशील, संस्थेचे व्यवहार आणि ठेवीदारांच्या दाव्यांची पडताळणी केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कारवाईमुळे ठेवीदारांमध्ये न्याय मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

यांच्यावर झाले गुन्हे दाखल...

माजलगाव येथील मुक्ताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळातील सदस्य तसेच कर्मचाऱ्यांसह एकूण १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून ठेवीदारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये अध्यक्ष विश्वांभर पांडुरंग शिंदे, उपाध्यक्ष अशोक विठ्ठल जोगडे, संचालक विलास सॉंदर, भागवत गंगात्रे, विशाल गोरे, केशव जोगडे, स्वाती सक्राते, अशोक चिगुरे, मोतीराम सिरसट, परमेश्वर कोरडे, शिवप्रसाद सर्जेराव सक्राते, विठ्ठल सक्राते, उद्धव जोगडे, महेश फल, किसन कुंडकर, बालाजी कुंडकर, कॅशिअर दीपक कटके तसेच रमेश उर्फ दगडुबा एकनाथ यादव यांचा समावेश आहे.

**शेवटगोडझाला...**

आहेत. तसेच वेंकटेश बँकेतील शेतकऱ्यांच्या खात्यावरही आज रक्कम वर्ग होणार असून दि. १७ जून २०२६ रोजी शेतकऱ्यांना ती रक्कम काढता येणार आहे.

कारखान्याच्या व्यवस्थापनाने भविष्यात ऊस बिलाबाबत कोणतीही अडचण येणार नाही, सर्व देयके वेळेत अदा करण्यात येतील तसेच शेतकऱ्यांनी निर्धास्तपणे ऊस कारखान्याकडे द्यावा, असे आश्वासन दिले.शेतकऱ्यांच्या एकजुटीचा आणि संघर्षाचा हा विजय आहे.

# धारूर येथे दोन दिवशी सहकार प्रशिक्षण उत्साहात संपन्न

धारूर / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड,यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती धारूर येथे नागरी सहकारी बँका,पतसंस्था करिता दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.

या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अभ्यासूतज्ञ,व्याख्याते खोडसे सी.ए. प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी नियामकमंडळाच्या नियमानुसार ठेवीचे व्याजदर, कायदेशीर



कर्ज वाटप व बंधने,कर्ज वसुली संदर्भात १०१ कायदेशीर प्रकरणे,कर्ज वाटप करत असताना घ्यावयाची वैधानिक दक्षता, भविष्यात संस्था अडचणीत येणार नाही याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.दुसऱ्या सत्रामध्ये सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस.आर. कोळे यांनी सहकार कायदा,नियम या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.तसेच सहाय्यक निबंधक सहकार अधिकारी श्रीमती ऋतुजा ठोके मॅडम यांनी नागरी व ग्रामीण पतसंस्थांनी नियामक मंडळाच्या परिपत्रकानुसार कामकाज करण्यात यावे,कायदा व नियम यांचे उल्लंघन न करता संचालक मंडळांनी कामकाज करण्यात यावे व येणाऱ्या काळात आपल्या सहकार क्षेत्रात आपली संस्था कशी उंचावेल याकडे लक्ष केंद्रित करावे व तसेच वेळोवेळी आम्ही सहकार्य करू असे आश्वासन दिले.या दोन दिवसीय प्रशिक्षणात उपस्थित सर्व कर्मचारी वृंद यांचे आभार श्रीमती दामिनी चिंचाळकरमॅडम यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्रसंचालन आभार वर्ग संयोजक एस.आर.कोळी यांनी केले.

# उर्दू विषयात जिल्ह्यात प्रथम येणारी कु. कुलसुम आरा जागीरदारचा तंज़ीम तरक्की उर्दूच्या वतीने भव्य सत्कार

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथील दहावी वर्गाची गुणवंत विद्यार्थिनी कुमारी शेख कुलसुम आरा मूनवर पाशा जागीरदार हिने सन २०२६ च्या एसएससी बोर्ड परीक्षेत उर्दू विषयात शंभर पैकी ९६ गुण मिळवून बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य उर्दू अकॅडमीचे चेअरमन तथा तंजीम तरक्की उर्दूचे अध्यक्ष डॉ. सय्यद हसीन अख्तर यांच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला.या गौरव कार्यक्रमात विद्यार्थिनीला प्रमाणपत्र, ट्रॉफी व पुष्पहार देऊन अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर



सोसायटीचे अध्यक्ष सय्यद मझहर कादरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डॉ. पठाण सिराज खान यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थिनीच्या यशाचा गौरव करत शाळेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा मांडला.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थिनीच्या परिश्रमांचे कौतुक करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उर्दू विषयाचे सहशिक्षक सय्यद रहबर यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी कुमारी कुलसुम आरा चे वडील मूनवर पाशा जागीरदार यांचीही उपस्थिती लाभली.

# केंद्र सरकारच्या माध्यमातुन बीड जिल्ह्यात मंजूर रेल्वे स्थानक कामांना जिल्हाध्यक्षांसह भाजप पदाधिकाऱ्यांची भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्ष पूर्ती निमित्त उपक्रम

बीड, प्रतिनिधी

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने केंद्र सरकारच्या वतीने बीड जिल्ह्यात झालेल्या विविध विकासकामांना भेटी देण्यात आला. यानिमित्त भाजप पदाधिकाऱ्यांनी बीड रेल्वे स्थानकाला भेट देऊन रेल्वे प्रकल्पासह जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या महत्त्वाच्या विकासकामांची पाहणी करुन मोदीजींचे आभार व्यक्त केले .

भाजप जिल्हाध्यक्ष शंकर



देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या भेटीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी बीडकरांच्या दीर्घकालीन स्वप्नपूर्ती ठरलेल्या रेल्वे प्रकल्पाला भेट देऊन . लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्ह्याला रेल्वे जोडणी मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. जिल्ह्यात रेल्वे यावी हे त्यांचे स्वप्न होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने या प्रकल्पाला गती दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लोकनेत्या पंकजाताई मुंडे माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे बीड रेल्वे प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाला असून जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

बीड रेल्वे स्थानकाच्या भेटीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी स्थानक परिसराची पाहणी करून रेल्वे सेवेमुळे जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांना होणाऱ्या सुविधांबाबत चर्चा केली. रेल्वेमुळे बीड जिल्ह्याचा राज्यातील तसेच देशातील विविध भागांशी संपर्क अधिक मजबूत होणार असून व्यापार, उद्योग आणि रोजगार निर्मितीला चालना मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी ड. सर्जेराव तांदळे, नवनाथ आण्णा शिराळे, शिवाजी आप्पा मुंडे, सलीम जहागीर, अशोक लोढा, प्रा. देविदास नागरगोजे, ड. गोविंद शिराळे, प्रमोद पुसरेकर, अमोल वडतिले, आप्पा झोडगे, अमर सानप, सचिन टिपते, सलीम अत्तार यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# बहुजन टायगर सेनेच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्षपदी चंद्रभिम हौजेकर यांची निवड

धर्माबाद / अशोक पडोळे

बहुजन टायगर सेना हि संघटना महाराष्ट्रभर काम करते आहे.याच संघटनेच्या

नांदेड दक्षिण जिल्हा उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार चंद्रभिम हौजेकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील तमाम महापुरुषांच्या विचारांना प्रेरित असलेली एकमेव बहुजन टायगर सेना हि सामाजिक संघटना नांदेड जिल्ह्यातून स्थापन झाली असून २०१६ पासून संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यरत आहे यानंतर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील, अनेक तालुक्यातील खेड्यात व गावा गावामध्ये बहुजन टायगर सेना काम करीत आहे. अनेक जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन समाजावरील होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात लोकशाहीच्या मार्गाने न्याय मिळवून घेण्यासाठी शासन-



प्रशासन दरबारी झटत आहेत.या संघटनेचे लाल,निळा आणि हिरवा हे तीन रंग आहेत. विजयाचे प्रतीक असलेला लाल रंग आहे. डॉ. बाबासाहेबांनी बहुजनांसाठी दिलेला निळा रंग आहे. हिरवा रंग हा मुस्लिम समाजाचे प्रतीक आहे. सर्व जाती-धर्माच्या समाजाला एकत्र करून प्रत्येक क्षेत्रातील घटकाला न्याय हक्कासाठी देणारी संघटना आहे.

मराठवाडा विभागीय कार्यालय नांदेड या ठिकाणी मराठवाड्यातील पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष माधवदादा जमदाडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीस (आय. सि.एस.-वाय. टी. एफ) चे संस्थापक राजेश्वर पालमकर, महाराष्ट्र प्रदेश युवा अध्यक्ष सुनील बाराटे, महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या अध्यक्षा कौशल्याताई रणवीर, सांप्रदाय महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव गुळवे महाराज, सांस्कृतिक कला महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उद्धव ढाकणीकर, मराठवाडा अध्यक्ष मधुकर दादा झगडे, मराठवाडा सचिव भालेराव भारत दादा, मराठवाडा महिला अध्यक्ष दीक्षाताई जमदाडे, उत्तर जिल्हाध्यक्ष कंधारेताई, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष बुक्तरेताई यावेळी यासह अनेक पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सर्वांच्या वतीने धर्माबाद तालुक्यातील सिद्धार्थ नगर बाळापूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार चंद्रभीम हौजेकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन यांची नांदेड दक्षिण जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी वर्ग, सामाजिक,धार्मिक क्षेत्रातून अनेक मान्यवर मंडळींकडून त्यांच्या भावी कार्याच्या वाटचालीसाठी अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. बहुजन टायगर सेनेचे ध्येय-धोरणे व उद्दिष्टे लक्षात घेता बहुजन समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन,अनेक जातीं धर्माच्या लोकांना एकत्र करून,वंचित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस सदैव प्रयत्नात राहून संघटन मजबूत करण्याचा मी प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया चंद्रभिम हौजेकर यांनी आपल्या निवडीबद्दल पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

# बीडमध्ये शिवदुर्गा-शिवसंवाद दौऱ्याअंतर्गत महिला आघाडीची बैठक उत्साहात संपन्न..!

बीड, प्रतिनिधी

शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि शिवसेनेचे संसदीय गटनेते ना. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे साहेब यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली राज्यभर सुरू असलेल्या शिवदुर्गा शिवसंवाद दौऱ्या अंतर्गत दि. १८ जून २०२६ रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली बीड-माजलगाव विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडीची भव्य व उत्स्फूर्त बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

या बैठकीस राष्ट्रीय सचिव श्रीमती शायना ताई एन.सी., उपनेत्या श्रीमती विजया पोटे , श्रीमती संगीता ठोंबरे ताई, श्रीमती कला शिंदे ताई, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, महिला संपर्कप्रमुख श्रीमती संगीताताई चव्हाण, महिला आघाडी जिल्हाप्रमुख श्रीमती चंद्रकलाताई बांगर, नगरसेविका श्रीमती शितलताई चक्रे, उपजिल्हाप्रमुख श्रीमती शारदाताई डोईजड तसेच तालुकाप्रमुख (बीड) श्रीमती जयश्रीताई वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी, संपर्कप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, युवासेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त



प्रतिसाद दिला. संपूर्ण परिसर भगवामय वातावरणाने भारावून गेला. बैठकीत महिला सक्षमीकरण, सक्षम संघटन जनतेचा विश्वास या त्रिसूत्रीच्या बळावर आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना विजयाचा नवा इतिहास रचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महिला शक्तीचा जागर, शिवसेनेचा विचार आणि जनतेशी थेट संवाद या माध्यमातून संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

महिला सक्षमीकरणातून सक्षम संघटन उभे करणे हेच उद्दिष्ट

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिला आघाडीचे संघटन अधिक मजबूत, गतिमान आणि विजयाभिमुख करण्यासाठी बैठकीत सविस्तर मार्गदर्शन केले. दरम्यान महिला आघाडी बीड जिल्हा संपर्कप्रमुख संगीताताई चव्हाण यांनी आपल्या मनोगतामध्ये कार्य अहवाल सादर करत बीड जिल्ह्यात महिला आघाडी अधिकाधिक सक्षम बनवणार असा विश्वास दिला.

# जागतिक योग दिनानिमित्त दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था व माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने योग शिबीराचे भव्य आयोजन

## ताण- तणाव दूर करण्यासाठी उपयुक्त ठरलेली चक्रीय ध्यान साधना योग प्रशिक्षक डॉ. राजेंद्र सारडा प्रात्यक्षिके सादर करणार

बीड /प्रतिनिधी

जागतिक योगदिनाचे औचित्य साधून माजी नासा शास्त्रज्ञ डॉ. एच.आर. नागेंद्र सर यांनी सन १९७१ साली बेंगळुरू येथील स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेमध्ये सर्वप्रकारचे मानवी ताण- तणाव तात्काळ दूर करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली संशोधीत चक्रीय ध्यान साधना उपयोगात आणली. यामध्ये तात्काळ (ईस्टंट )रिलॅक्सेशन टेक्नीक, क्विक रिलॅक्सेशन टेक्नीक व एस आर टी रिलॅक्सेशन टेक्नीक यांच्या उपयुक्त अंगिकारनाने कोणतेही मानवी ताण- तणाव लवकर दूर होतात. अशा महत्त्वपुर्ण चक्री ध्यान साधनेचे प्रात्यक्षिके १२ व्या. जागतिक योग दिनानिमित्त योग प्रशिक्षक डॉ. राजेंद्र सारडा करुन दाखविणार आहेत.




दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था, बीड व माहेश्वरी प्रगती मंडळ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व्या. जागतिक योग दिनानिमित्त रविवार दि. २१ जुन २०२६ रोजी सकाळी ०५.४५ ते ०७.०० दरम्यान वृंदावन गार्डन एम.आय.डि.सी. रोड, पेठ बीड येथे योग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योग साधनेत सहभागी व्हावे असे आवाहन दीपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था बीडचे अध्यक्ष विष्णुदास बियाणी, उपाध्यक्ष सुरज लाहोटी, सचिव ॅड. डॉ. राजेंद्र सारडा, कोषाध्यक्ष सी.ए. उमेश कासट, प्रकल्प सभापती अमर सपकाळ, प्रकल्प सभापती सी.ए. गोपाल कासट यांच्यासह सर्व सदस्य तसेच माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, उपाध्यक्ष संतोष टवाणी, सचिव जुगलकिशोर बियाणी, कोषाध्यक्ष जगदीश सिकची, सहसचिव राजेंद्र चरखा, राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाचे डॉ. शिवप्रसाद चरखा यांच्यासह सर्व सदस्यांनी केले असून योग शिबिरासाठी येताना महिला, पुरुष युवक युवतीसह जेष्ठ साधकांनी योगामॅट (सतरंजी), व असल्यास योगा पोषाख किंवा रोजच्या पोषाखात वेळेवर यावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३४९/२०२६**
इंदुबाई भ्र.भुजंगराव हसेगांवकर वि. निरंक
**(मार्फत-ॲड.एल.जी.कुलकर्णी, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **विश्वनाथ पि.जानराव आमलेकर, रा.गेवाई ता.गेवराई जि.बीड हे/ह्या दि.१८.०८.२०१२ रोजी रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.इंदुबाई भ्र.भुजंगराव हसेगांवकर, वय-८५ वर्षे, धंदा-शेती, रा.वाहेगांव आमला, ता.गेवराई जि.बीड ह.मु.बीड ता.जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **विश्वनाथ पि.जानराव आमलेकर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१२/०६/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२१/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३२४/२०२६**
मंगल विरुध्द निरंक
**(मार्फत-ॲड.आर.आर.आंबट)**

ज्याअर्थी मयत नामे **कृष्णा पि.घनशाम कोंढरे** हे दि.२०.०१.२०२४ **रोजी मौजे राक्षसभुवन ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.मंगल भ्र.कृष्णा कोंढरे, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.राक्षसभुवन ता.गेवराई जि.बीड, २.विलास पि.कृष्णा कोंढरे, वय-४५ वर्षे, धंदा-शेती, रा.राक्षसभुवन ता.गेवराई जि.बीड, ३.मिना भ्र.अर्जुन खिरे वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.भुई गल्ली, पोहनेर ता.जि.बीड, ४.योगेश पि.कृष्णा कोंढरे, वय-३८ वर्षे, धंदा-शेती, रा.राक्षसभुवन ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **कृष्णा पि.घनशाम कोंढरे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२५/०६/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३७०/२०२६**
अशोक पि.माधव जाधव वि.निरंक
**(मार्फत-ॲड.ए.एस.नाकाडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **माधव पि.बुवाजी जाधव, रा.नवी खडकी, पुणे नं.६ ता.जि.पुणे हे दि.१८.१०.१९८५ रोजी रा.नवी खडकी पुणे नं.६ ता.जि.पुणे** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **अशोक पि.माधव जाधव, वय-६८ वर्षे, धंदा-पेन्शनर व शेती, रा.शेकटा ता.गेवराई जि.बीड, ह.मु.लोहगांव पुणे ता.जि.पुणे** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **माधव पि.बुवाजी जाधव** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१७/०६/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२८/०७/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४४५ दि.२१.११.२०२५**
**जाहिर प्रगटन**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **बाजीराव काकासाहेब वावरे, रा.करंजळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवतेज बाजीराव वावरे | मुलगा | २०.०५.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# अमोल गहिरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच.डी.पदवी प्रदान

## ग्रामीण विकासात सरपंचाची भूमिका या विषयावरील शोधप्रबंधाची विद्यापीठाकडून दखल माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांच्यासह मान्यवरांकडून अभिनंदन

जालना शेख फारुक :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने अमोल गहिरे यांना नुकतीच पीएच.डी.विद्यावाचस्पती ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्रदान करण्यात आली आहे. दि. १२ जून २०२६ रोजी विद्यापीठाने त्यांच्या या पदवीची अधिकृत घोषणा केली. त्यांच्या या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार राजेशभैय्या टोपे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे.

अमोल गहिरे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण येथील नामांकित मार्गदर्शक डॉ. उमाकांत राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आपला शोधप्रबंध पूर्ण केला. त्यांनी ग्रामीण विकासात सरपंचाची भूमिका जालना



जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा विश्लेषणात्मक अभ्यास या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषयावर आपला शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. जालना जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचा आणि विकासातील सरपंचांच्या योगदानाचा अत्यंत सखोल आणि विश्लेषणात्मक अभ्यास त्यांनी या संशोधनातून मांडला आहे.संशोधनाचे विशेष कौतुक

ग्रामीण भागाच्या विकासाची धुरा वाहणाऱ्या सरपंच या घटकावर अमोल गहिरे यांनी केलेला हा अभ्यास आगामी काळात अभ्यासक आणि प्रशासनासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव आणि शुभेच्छा

अमोल गहिरे यांना पीएच.डी. पदवी बहाल झाल्याचे वृत्त समजताच राजकीय सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री मा.आ. राजेशभैय्या टोपे आणि संस्थेच्या सचिव सौ. मनिषाताई टोपे यांनी गहिरे यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी खालील मान्यवरांनीही त्यांचे अभिनंदन केले डॉ.बी.आर.गायकवाड प्रशासकीय अधिकारी मत्स्योदरी शिक्षण संस्था राहुल भालेकर सहप्रशासकीय अधिकारी डॉ.भागवतराव कटारे माजी प्राचार्य, डॉ. मिलिंद पंडित प्राचार्य मत्स्योदरी महाविद्यालय अंबड डॉ. दादासाहेब गजहंस प्राचार्य अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना,डॉ.संजय पाटील सुरेश ठेंग कार्यालयीन अधीक्षक अमोल गहिरे यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि संशोधन कार्यासाठी उपस्थित सर्व मान्यवरांनी त्यांना दमदार शुभेच्छा दिल्या आहेत.

# मंठा तहसीलदारांच्या कार्यकाळाची चौकशी

## उपविभागीय अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश

मंठा प्रतिनिधी

मंठा तहसीलदार सौ. सुमन मोरे यांच्या कार्यकाळातील कामकाजाबाबत आलेल्या तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश परतूरचे उपविभागीय अधिकारी यांनी दिले आहेत. यासंदर्भात मंठा तहसीलदारांना सविस्तर खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय (गौण खनिज शाखा), जालना यांच्या पत्रानुसार व वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सुगाभ सखाराम जाधव यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ही कार्यवाही करण्यात आली आहे. तक्रारीमध्ये तत्कालीन तहसीलदारांच्या कार्यकाळात मंठा तालुक्यात अवैध वाळू उत्खनन, वाळू साठे, जप्ती कारवाया तसेच महसूल वसुलीबाबत गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

या प्रकरणात चौकशी करून कारवाई न झाल्यास १५ जून २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

उपविभागीय अधिकारी, परतूर यांनी मंठा तहसीलदारांना पत्राद्वारे तत्कालीन कार्यकाळातील वाळू जप्ती कारवाया, वाळू साठे, महसूल वसुली आदी बाबींचा सविस्तर वस्तुनिष्ठ खुलासा तात्काळ सादर करण्याचे आदेश दिले असून, त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अहवाल पाठविण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या कामात कोणताही विलंब होऊ नये, असेही निर्देश पत्रात देण्यात आले आहेत.



## माहोरा गावात भीषण पाणीटंचाई; हंडाभर पाण्यासाठी महिलांची तासन्तास प्रतीक्षा

मंठा /प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील माहोरा गावात ऐन पावसाळ्याच्या तोंडावर भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. पावसाने दांडी मारल्याने गावातील विहिरी, हातपंप आणि बोअरवेलमधील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात आटला आहे. त्यामुळे नागरिकांना, विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना, पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे.

शेती मशागतीची कामे सुरू असतानाच पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. गावातील काही बोअरवेलमध्ये अत्यल्प प्रमाणात पाणी उपलब्ध होत असले तरी एक हंडाभर पाण्यासाठी महिलांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. पाण्याच्या टंचाईमुळे पाणी भरण्याच्या ठिकाणी महिलांमध्ये वारंवार वाद व भांडणेही होत असल्याचे चित्र आहे.

माहोरा गावातील वाढत्या पाणीटंचाईची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा तसेच गावासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गावातील पाणी प्रश्न त्वरित सोडविण्याची अपेक्षा नागरिकांनी प्रशासनाकडे व्यक्त केली आहे.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या कथित गैरप्रकारांविरोधात संभाजी ब्रिगेड आक्रमक ;आंदोलनाचा इशारा

मंठा, प्रतिनिधी :

मंठा तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यासंदर्भात ग्रामपंचायत इतिवृत्तामध्ये खोटी माहिती नोंदवून शासन, ग्रामसभा व ग्रामस्थांची दिशाभूल केली असून शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात यापूर्वी पंचायत समिती प्रशासनाकडे सविस्तर निवेदन सादर करूनही अद्याप कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शिवश्री बालासाहेब भगवान खवणे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित प्रकरणात ग्रामपंचायत इतिवृत्त, ग्रामसभा अभिलेख व शासन नोंदींमध्ये वास्तव्यासंदर्भात संशयास्पद व दिशाभूल करणाऱ्या नोंदी करण्यात आल्याची शक्यता आहे. मुख्यालयी वास्तव्यास राहत नसतानाही वास्तव्यास असल्याचे दाखवून



शासनाचे विविध आर्थिक लाभ घेतले असल्यास हा प्रकार शासनाच्या निधीची फसवणूक मानला जाऊ शकतो.निवेदनात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम, सार्वजनिक अभिलेखांमधील खोटी माहिती, पदाचा गैरवापर, शासनाची दिशाभूल, आर्थिक गैरव्यवहार तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत (इछड) लागू होणाऱ्या विविध तरतुदींचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत चौकशीस पात्र बाबी आढळल्यास संबंधित प्रकरण सक्षम प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडने चौकशीदरम्यान ग्रामसभा इतिवृत्त पुस्तके, मूळ दप्तर, उपस्थिती नोंदी, मुख्यालय वास्तव्यासंदर्भातील पुरावे, वीज व पाणी वापराची माहिती, कार्यालयीन उपस्थिती, सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर संबंधित अभिलेखांची सखोल पडताळणी करण्याची मागणी केली आहे. पुरावे नष्ट होण्याची अथवा कागदपत्रांमध्ये फेरफार होण्याची शक्यता लक्षात घेता चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर आवश्यक प्रशासकीय निर्बंध लावण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, यापूर्वी सादर केलेल्या निवेदनावर कोणतीही प्रभावी कारवाई न झाल्यामुळे संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने दिनांक २५ जून २०२६ रोजी पंचायत समिती मंठा कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. हे आंदोलन जनहित, पारदर्शक प्रशासन, ग्रामस्थांच्या अधिकारांचे संरक्षण आणि शासन फसवणुकीविरोधातील लढा असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

प्रशासनाने २५ जूनपूर्वी निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय, आर्थिक व फौजदारी कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे.

# मृग नक्षत्र कोरडे गेल्याने बळीराजा हवालदिल बारसवाड्यात गल्हाटी नदीची पूजा करून महिलांचे वरुणराजाला साकडे

अंबड प्रतिनिधी :-

मृग नक्षत्र उजाडूनही पावसाने पाठ फिरवल्यामुळे संपूर्ण परिसरात चिंतेचे ढग दाटले आहेत. खरीप हंगामाच्या पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या असून वाढत्या उन्हाच्या कडाक्यामुळे आधीच उगवलेली पिके आता शेतातच माना टाकू लागली आहेत. हवामान विभागाने मान्सूनच्या आगमनाला आणखी काहीसा विलंब होणार असल्याचा अंदाज वर्तवल्याने ग्रामीण भागातील शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतीचे होणारे मोठे नुकसान टळावे आणि वरुणराजाने लवकरात लवकर कृपा करावी यासाठी बारसवाडा येथे महिलांनी एकत्र येत गल्हाटी नदीची मनोभावे पूजा केली आणि जलाभिषेक करून वरुणराजाला साकडे घातले.

हे गंगा मैया दुष्काळ दूर कर... महिलांची आर्त हाक

नदीकाठावर जमा होत गावातील



महिलांनी पारंपरिक पद्धतीने गल्हाटी नदीचे पूजन केले. यावेळी गंगेला अर्घ्य अर्पण करताना महिला भावुक झाल्या होत्या.हे गंगे हे गंगा मैया धरणीमाता तहानलेली आहे. पशू-पक्षी आणि शेतकरी राजा तुझ्या कृपेची वाट पाहत आहेत. हे माते आता तुझीच आस आहे. वरुण राजाला विनंती कर आणि आमच्या शेतात गावावर आणि संपूर्ण सृष्टीवर अमृतासारख्या पावसाच्या धारा बरसून दे. दुष्काळ दूर कर आणि आमच्या बळीराजाला सुखी कर अशी आर्त साद महिलांनी यावेळी गंगा मैयाला घातली.

गावागावांत प्रार्थना आणि भजनांचा गजर

पावसाने ओढ दिल्यामुळे केवळ बारसवाडाच नव्हे, तर परिसरातील अनेक गावांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पिके सुकण्याच्या मार्गावर असल्याने बळीराजा संकटात सापडला आहे. या नैसर्गिक संकटातून सुटका व्हावी यासाठी सध्या ग्रामीण भागात गावागावांत भजन, कीर्तन आणि पारंपरिक पद्धतीने विशेष प्रार्थनांचे आयोजन केले जात आहे. वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी अबालवृद्ध देवाचा धावा करत आहेत.

पाऊस वेळेवर पडावा आणि पुन्हा एकदा शिवार हिरवेगार व्हावे, या शुद्ध हेतूने आयोजित केलेल्या या गल्हाटी नदी पूजन प्रसंगी गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये प्रामुख्याने उषा सुळे, नंदा सुळे, मुक्ता सुळे, अश्विनी सुळे आदी महिलांनी पुढाकार घेऊन हा धार्मिक विधी संपन्न केला. आता गल्हाटी मैया आणि वरुणराजा गावकऱ्यांच्या या आर्त हाकेला कधी ओ देणार, याकडे संपूर्ण परिसराचे डोळे लागले आहेत.



# कर्तव्यनिष्ठ,धडाकेबाज कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांच्या पाठीशी

केज/प्रतिनिधी

केज महावितरण कंपनीच्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शितल वाजीदअली सय्यद यांनी एकवर्षाच्या कार्यकाळात वीज चोरी बाबत मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या.शहर आणि ग्रामीण भागात ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता स्वतः रस्त्यावर उभे राहून कर्तव्यदक्षपणे काम करत आहेत.ज्यांना कर्तव्यदक्ष अधिकारी नको आहेत अशा अनेक पुढारी,लोकप्रतिनिधी, धनदांडगे यांनी यांच्या विरोधात खोट्या तक्रारी केल्या.त्यांच्या बदली साठी प्रयत्न करतआहेत. कारण त्यांना कर्तव्यनिष्ठ अधिकारी नको आहेत.

प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शितल सय्यद यांना कार्यालयातून वरिष्ठ आणि अनेक कर्मचाऱ्यांचा छुपा विरोध होतो आहे.त्या विरोधाला न जुमानता त्या करतात.अनेक तांत्रिक प्रश्न सोडवून नागरिकांना पूर्ण वेळ वीज उपलब्ध करून देत आहेत.वीज चोरीचे दंड ठोठावताना कोणाचीही शिफारसीला त्याजुमानत नाहीत.धडाकेबाज कारवाईचे सत्र त्यांचे सुरू असते.कोणत्याही वेळी ग्राहकांनी फोन लावला तर त्यांची समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी त्या सज्ज असल्याचे ग्राहक सांगतात.बेधडक कारवाया करणे कर्तव्य दक्षपणे कामावर असणे यामुळे त्यांना अनेकांच्या विरोधाला सामोरे जावे लागते.एका महिला अधिकारी निर्भीडपणे काम करतात अनेकांच्या धमक्या विरोध खोट्या तक्रारी यास न जुमानता त्यांनी सामान्यांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.त्यांच्या बदलीच्या रोजच चर्चा सुरू असतात मात्र बदलीला न जुमानता आपण जिथे जाऊ तिथे प्रामाणिकपणे काम करू अशी भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.अद्यापपर्यंत कोणाकडूनही कधी एक रुपया घेतला नाही. महावितरण कंपनीकडून मिळत असलेल्या वेतनावर समाधानी राहून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अशी शितल सय्यद यांची ओळख निर्माण झाली आहे.प्रामाणिक कामामुळे केजकर त्यांच्या पाठीशी उभे राहत आहेत.

# नीट (युजी) २०२६ प्रवेश परिक्षार्थींची होणार वैद्यकीय तपासणी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी नीट (युजी)-२०२६ प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधित वस्तूच्या वापरावर प्रशासनाचे कडक लक्ष असून, इलेक्ट्रॉनिक, ब्लूटूथ वापर बंदी करण्यासाठी परीक्षार्थींची वैद्यकीय तपासणी होणार आहे. जर परीक्षा केंद्रावर प्रतिबंधीत करण्यात आलेल्या वस्तू परीक्षार्थीकडे आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल. नियमानुसार व कायद्यानुसार संबंधित उमेदवाराविरुध्द कारवाई करण्यात येईल. याची नोंद सर्व परीक्षार्थींनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली मार्फत आयोजित नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५.१५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेकरिता नांदेड जिल्ह्यात एकूण ४२ केंद्र असून त्यापैकी नांदेड शहरात २५ परीक्षा केंद्रे तसेच ग्रामीण भागात १७ परीक्षा केंद्र अशी एकूण ४२ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. छएएढ णत्रक्ष-२०२६ प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी २१ जून २०२६ रोजी परीक्षा केंद्रावर सकाळी ठीक ११ वाजता रिपोर्टींग करावे. स.११ ते १.३० ही वेळ परिक्षार्थींची तपासणीची वेळ राहील.

परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षार्थी मार्फत कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होऊ नये. जसे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा, ब्लूटूथचा वापर तसेच मनगटी डिजिटल घडयाळीचा वापर करण्याचे परीक्षार्थी यांनी कटाक्षाने टाळावे तसेच वरील बाबींना आळा घालण्यासाठी परीक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत ELECTRONIC DIVICE, EAR BUD व तत्सम बाबीची तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत पडताळणी केली जाणार आहे याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये खालील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी असणार नाही.

# केज मध्ये तुकाराम मुंडे यांच्या समर्थनार्थ जनता रस्त्यावर

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाचे कर्तव्यदक्ष इमानदार व निर्भय आय. ए.एस.अधिकारी मा. तुकाराम मुंडे यांच्या उत्कृष्ट कार्याला पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी दुपारी तीन वाजता केज शहरात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्या पुढाकाराने कानडी रोड,मंगळवार पेठ,डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते केज तहसील कार्यालय अशी विद्यार्थी,युवक व तरुणांची भव्य रॅली काढण्यात आली होती.

तुकाराम मुंडे हे बीड जिल्ह्याचे सुपुत्र आहेत. सध्या त्यांनी जनतेचे आयुष्य ज्यावर अवलंबून आहे अशा अन्न व औषधी विभागात कठोर कार्यवाही करत अन्न व औषध




भेसळमुक्त करण्यासाठी कठोर पावले उचलून कार्यवाही सुरु केली आहे.यामुळे महाराष्ट्रातील जनतेचे जीवन आपोआप सुरक्षित बनले आहे.एक कर्तव्यदक्ष व प्रामाणिक आणि निर्भय अधिकारी जनतेसाठी किती महत्वाचे कार्य करू शकतो व प्रशासनात आपली भूमिका कशी पार पाडू शकतो हे दाखवून दिले आहे. प्रत्येक आय ए एस व आय पी एस अधिकाऱ्याने आपले हक्क व अधिकार निर्भयपणे वापरल्यास जनतेला कसा मोठा फायदा होतो व जनतेचे हीत आणि कल्याण आपोआप सिद्ध होते हे त्यांनी दाखवले आहे.

मा.तुकाराम मुंडे हे आता महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्याचा पहारेदार बनले असून यापुढे महाराष्ट्र शासनाने त्यांच्यावर कोणतीही चुकीची किंवा व्यक्ती द्वेष्याची कार्यवाही करू नये नसता केज तालुक्यातील जनता त्यांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरेल असा इशाराही निवेदनातून शासनाला देण्यात आला आहे.केज शहराच्या मुख्य रस्त्यावरून काढलेल्या या रॅलीच्या विविध घोषणांनी केज शहर दणाणून गेले होते. रॅलीमध्ये युवक,युवती व नागरिकांसोबतच मनवेध अकॅडेमी व ज्ञानज्योती क्लासेस चे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.रॅलीचा समारोप तहसील कार्यालय परिसरात तहसीलदार शुभम पवार यांनी निवेदन स्विकारल्या नंतर करण्यात आला. यावेळी विजय देशमुख, श्रीराम सारुक,ज्ञानेश कलढोणे यांनी मार्गदर्शन केले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# श्री.परिवंत गायकवाड यांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा

# महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ आदर्श समाजसेवक पुरस्कार जाहीर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) समाजसेवा ही केवळ प्रसिद्धी किंवा पदासाठी नसून ती समाजाप्रती असलेल्या निष्ठा, बांधिलकी आणि कर्तव्यभावनेतून केली जाते. अशाच निस्वार्थी वृत्तीने अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि विकासात्मक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत जनसामान्यांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण करणारे आष्टी तालुक्यातील कऱ्हेवडगावचे आदर्श सरपंच, प्रसिद्ध समाजसेवक, गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. परिवंत गायकवाड यांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ आदर्श समाजसेवक पुरस्कार जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार जाहीर होताच आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, पत्रकार, शिक्षक, व्यापारी आणि ग्रामस्थांकडून श्री. गायकवाड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याची ही योग्य दखल असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

श्री. परिवंत गायकवाड यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. गावपातळीवरील विकासकामे, गरीब व गरजू कुटुंबांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहकार्य, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना पाठबळ, तसेच सामाजिक ऐक्य व बंधुभाव जपण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय मानले जातात. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याचा त्यांचा दृष्टिकोन सर्वांनाच प्रेरणादायी वाटतो.

कऱ्हेवडगावचे सरपंच म्हणून काम करताना त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. पायाभूत सुविधांच्या उभारणीपासून ते ग्रामविकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यापर्यंत त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण आणि सार्वजनिक सुविधांच्या उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे कऱ्हेवडगावच्या विकासात त्यांचे योगदान विशेष अधोरेखित केले जाते.



कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणूनही त्यांनी शेतकरी हिताच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांना न्याय्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाशी त्यांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि त्यांच्या अडचणी सोडविण्याची तळमळ यामुळे त्यांना शेतकरी वर्गात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या श्री. गायकवाड यांनी अनेक गरजू कुटुंबांना आर्थिक व मानसिक आधार देण्याचे काम केले आहे. संकटाच्या काळात मदतीसाठी धावून जाणारा समाजसेवक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता केलेली मदत आणि सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची त्यांची वृत्ती यामुळे समाजात त्यांच्याविषयी आदराची भावना आहे.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्काराने गौरविण्यात येते. समाजकारण, शिक्षण, आरोग्य, उद्योग, कृषी, पत्रकारिता, कला, क्रीडा आणि लोकसेवा अशा विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदाच्या वर्षी आदर्श समाजसेवक या विभागासाठी श्री. परिवंत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन लोकनेते, मराठवाडा भूषण आ. सुरेश आण्णा धस यांच्या अध्यक्षतेखाली दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर येथील हॉटेल मेघनंद येथे करण्यात आले आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रांतील पुरस्कारार्थी, मान्यवर पाहुणे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

श्री. परिवंत गायकवाड यांना जाहीर झालेला हा पुरस्कार त्यांच्या सामाजिक कार्याची, लोकहितासाठी केलेल्या अविरत प्रयत्नांची आणि समाजाप्रती असलेल्या समर्पित भावनेची पावती मानला जात आहे. त्यांच्या कार्यातून अनेक तरुणांना समाजसेवेची प्रेरणा मिळत असून समाजहितासाठी काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी त्यांचा प्रवास आदर्शवत ठरत आहे.

दातृत्व जपणारे कर्तृत्वशील नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या श्री. परिवंत गायकवाड यांना जाहीर झालेल्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे आष्टी तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या पुढील सामाजिक कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# बीडमध्ये एफडीएची मोठी कारवाई, ६.६८ लाखांचे निकृष्ट मिठाई साहित्य जप्त;भेसळ बाजांचे धाबे दणाणले!

बीड/प्रतिनिधी

नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अन्न माफियांविरोधात अन्न व औषध प्रशासन एफडीए विभागाने केज शहरात एक मोठी आणि धडाकेबाज कारवाई केली आहे.शहरातील एका मिठाई उत्पादन युनिटवर टाकलेल्या छाप्यात तब्बल ६ लाख ६८ हजार ४०९ रुपयांचा संशयास्पद आणि निकृष्ट दर्जाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या कारवाईमुळे जिल्ह्यातील भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्रेत्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

**अस्वच्छतेचे साम्राज्य आणि संशयास्पद साठवणूक**

अन्न व औषधप्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी श्री.तुकाराम मुंडे यांनी १७ जून रोजी बीड शहरातील एका नामांकित मिठाईनिर्मिती कारखान्याची अचानक तपासणी केली.या तपासणी दरम्यान मिठाई बनवण्यासाठी वापरण्यात




येणारे कच्चे साहित्य अत्यंत अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त आणि मानवी आरोग्याला गंभीर अपाय ठरेल अशा भयानक परिस्थितीत साठवून ठेवल्याचे उघडकीस आले.उत्पादन प्रक्रिया आणि साठवणुकीच्या ठिकाणी नियमांचे सर्रास उल्लंघन झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

**या अन्नपदार्थांचे नमुने जप्त**

कारवाईदरम्यान पथकाने कारखान्यातून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल जप्त केला.यामध्ये प्रामुख्याने खालील पदार्थांचा समावेश आहे. लिक्विड ग्लुकोज,खुला खवा(मावा),वनस्पतीतूप (सूर्या गोल्ड),प्रीमियम गोल्ड हलवा (व्हाईट आणि ब्राऊन),इंडियन स्वीट ट्रेडिशनल फूडस्वीट प्रयोगशाळेच्या अहवालानंतर होणार कठोर कारवाई जप्त करण्यात आलेल्या सर्व अन्नपदार्थांचे नमुने तातडीने रासायनिक तपासणीसाठी प्रयोग शाळेकडे पाठवण्यात आले आहेत.हा प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, संबंधित दोषींवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार (फसाई) थेट फौजदारी किंवा कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

### प्रशासनाचा कडक इशारा

ही धडक कारवाई सहाय्यक आयुक्त (अन्न) यांच्या थेट मार्गदर्शना खाली अन्न सुरक्षा विभागाच्या विशेष पथकाने पार पाडली. सणासुदीच्या दिवसांत मिठाईला वाढती मागणी लक्षात घेता ग्राहकांची फसवणूक आणि आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांची गय केली जाणार नाही.शहरात ही मोहीम अशीच तीव्रतेने सुरू राहणार असून, नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्यांवर प्रशासनाचा करडा बडगा कायम राहील,असा सज्जड इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

# वडवणीत शेतकऱ्यांचा एल्गार: १९ जूनपासून दुधाला ८० भाव

वडवणी (प्रतिनिधी): वडवणी तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आज एक ऐतिहासिक पाऊल उचलले. तुकाराम मुंडे साहेबांच्या प्रेरणेतून येथे झालेल्या शेतकरी बैठकीत १९ जून २०२६ पासून दुधाला किमान ८० भाव बंधनकारक करण्याचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला.

काल वार गुरुवार रोजी रेणुका माता मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत २० हून अधिक गावांतील ३०० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. बैठकीत ठरले की, उद्या दि. १९ जूनपासून वडवणी तालुक्यातील कोणत्याही दूध डेअरीला शेतकऱ्यांकडून ८० पेक्षा कमी भावाने दूध खरेदी करता येणार नाही. प्रत्येक दूध संकलन केंद्रावर १९ जूनपासून दुधाला ८० भाव असा फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. जो डेअरीचालक या निर्णयाचे उल्लंघन करेल, त्याच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला. तसेच वडवणी शहर



तालुक्यात घरगुती दुधाला ही ८० रुपये प्रतिलिटर दराने विक्री करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. या निर्णयाचे सर्व स्तरातील नागरिकांनी स्वागतच केले मात्र शुद्ध दूध पुरवठा करावा अशी मागणी केली आहे.

**१०० साठी पुढचा लढा**

दुधाला १०० भाव मिळवण्यासाठी आम्ही ठाम होतोत मात्र ग्राहकांनाही विचार करून ८० चा भाव केल. ग्राहकांना शुद्ध दुध देऊन विश्वास संपादन करून जोपर्यंत शेतकऱ्याच्या दुधाला १०० भाव मिळत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील असं मत बैठकीत व्यक्त करण्यात आलं

# गेवराईतील तय्यब नगर येथे एसटी बसला अधिकृत थांबा द्यावा



**मा.नगरसेवक सय्यद एजाज यांची एस टी आगार व्यवस्थापकांकडे मागणी**

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई शहरातील तय्यब नगर व परिसरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदारांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी भारत गॅस, विधुत महावितरण (एमएसईबी) कार्यालयासमोर एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर करण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी गेवराई एस टी आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

तय्यब नगर परिसराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून येथून दररोज जिल्हा परिषद उर्दू शाळेचे विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरदार तसेच वयवृद्ध महिला पुरुष मोठ्या संख्येने शहरात व इतर ठिकाणी प्रवास करतात सकाळी व सायंकाळी शाळा-महाविद्यालयांच्या वेळेत प्रवाशांची मोठी गर्दी असते.

मात्र, या परिसरात एसटी बसचा अधिकृत थांबा नसल्यामुळे परिसरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना बस पकडण्यासाठी लांब अंतर पायी जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, महिला,पुरुष व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे तय्यब नगर गेवराई येथे एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर झाल्यास प्रवाशांची मोठी सोय होईल, त्यांचा वेळ वाचेल तसेच प्रवाशांची संख्या वाढल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नातही वाढ होईल. निवेदनाद्वारे तय्यब नगर येथे सर्व नियमित एसटी बसांना अधिकृत थांबा मंजूर करावा,शाळा व महाविद्यालयांच्या सकाळी आणि सायंकाळीच्या वेळेत बसेस नियमित थांबवण्यात यावे,या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तय्यब नगर येथे तात्काळ एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर करावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी केली आहे. यावेळी शेख निसार, सय्यद बादशाह, लाला तांबोली, सय्यद रौफ, शेख बाबू व त्यापरिसरातील नागरिकांनी केली आहे.

## साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे

# जिल्हास्तरीय शिक्षक टीओटी प्रशिक्षणाचे मा.जितीनजी रहमान साहेब यांच्या हस्ते उद्घाटन

केज/प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणसंस्था अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित बीड जिल्ह्यातील शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण २०२६ इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी व सहावी शिक्षकांचे प्रशिक्षण टीओटी मराठी व उर्दू माध्यम आज साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे दि.१७ जुन २०२६ ते ३ जुलै २०२६ या कालावधीत संपन्न होत आहे.या प्रशिक्षणाचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे सीईओ श्री.जितिन रहमान साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले.या प्रशिक्षणास संबंध जिल्हाभरातून ४५० शिक्षक सहभागी झालेले आहेत.सदर प्रशिक्षण हे निवासी स्वरूपाचे असून सदर प्रशिक्षणात नवीन शिक्षण धोरण २०२० नुसार इयत्ता दुसरी, तिसरी,चौथी व सहावी चालू शैक्षणिक वर्षा पासून बदलेल्या अभ्यासक्रम यासंदर्भात माहिती देण्यात येत आहे या प्रशिक्षणाचे उद्घाटन प्रसंगी सीईओ श्री. जितीन रहेमान साहेब शिक्षकांना मार्गदर्शन करत असताना म्हणाले की,केवळ वेतनासाठी काम न करता आपण आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहा.आपल्या व्यवसायावर प्रेम करा. तुमच्या हातात भारत देशाची पिढी घडवण्याचे कार्य आहे हे कार्य उत्कृष्ट रीतीने आपण पार पाडाल अशी मलाअपेक्षा आहे.दिवसेंदिवस खाजगी शाळांचा पट वाढत असून जिल्हा परिषद शाळांचा पट कमी होत आहे याचे कारण जन्मदर, लोकसंख्या नियंत्रण आणि चांगले व अधिकचे मिळवण्याचा प्रयत्न यासाठी पालक सातत्याने प्रयत्न करत असतो.त्यामुळे आपण आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थी एक स्वतंत्र पुस्तक आहे आणि त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची गरज, आवडनिवड




विचारात घेऊन शैक्षणिक कार्य करावे व आपल्या जिल्हा परिषद शाळांचा पट टिकवून ठेवावा. आपणास दिले जाणारे प्रशिक्षण व्यवस्थितरित्या आपण घेऊन ते विद्यार्थ्यांच्या गळी उतरवण्यासाठी प्रयत्न करावेत जेणे करून उद्याची पिढी सक्षम बनेल.तसेच यावेळी डाएट कॉलेजचे प्राचार्य डॉ.अनिल मुरकुटे सर यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई डाएटच्या वतीने दिले जाणारे प्रशिक्षण ही दर्जेदार दिली जातात.यासाठी आमची संपूर्ण टीम कार्य करत असते.प्रशिक्षणा मध्ये कोणत्याही प्रकारची उणीव राहणार नाही याची काळजी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था सातत्याने घेत असते व प्रत्येक वर्षी अधिक दर्जेदार शिक्षक प्रशिक्षण देण्याचा सातत्याने प्रयत्न करते. डायटच्या माध्यमातून राज्य स्तरावर पाठवले गेलेले प्रशिक्षणार्थी व जिल्हा स्तरावर निवडले गेलेले प्रशिक्षणार्थी हे दर्जेदारच निवडले गेलेले आहेत.जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेऊन तालुका स्तरावर अतिशय चांगल्या पद्धतीने सुलभक प्रशिक्षण देण्याचे काम करतील अशी मला अपेक्षा आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डायटचे अधिव्याख्याता डॉ.राजेश गोरे सर यांनी केले.सूत्रसंचालन जाधव मॅडम यांनी केले तर आभार डॉ.कविता गित्ते मॅडम यांनी मांडले.या उद्घाटनप्रसंगी गटशिक्षण अधिकारी श्री.सुनील केंद्रे साहेब,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे सर,ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. भागीरथी गिरी मॅडम, ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे संस्था अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड सर उपस्थित होते.यावेळी राज्यस्तरावर प्रशिक्षण घेतलेले २० सुलभक व संपूर्ण जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# आईचे स्वप्न साकारण्यासाठी ७० लाखांचे दातृत्व!

## बिभीषण गायकवाड यांनी स्वखर्चातून सुकळीत उभारली जिल्हा परिषद शाळा

अंबाजोगाई- प्रतिनिधी

केज: सामाजिक बांधिलकी आणि मातृप्रेमाचा एक अनोखा आणि प्रेरणादायी आदर्श बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात पाहायला मिळाला आहे. सुकळी येथील रहिवासी आणि पुणे येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक बिभीषणराव गायकवाड यांनी आपल्या दिवंगत आईचे स्वप्न साकार करण्यासाठी तब्बल ७० लाख रुपये स्वतः खर्च करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी पाच सुसज्ज आरसीसी वर्गखोल्या उभारल्या आहेत. या नूतन आणि आधुनिक शाळा इमारतीचे दिमाखदार लोकार्पण बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांच्या हस्ते बुधवारी, १७ जून रोजी अत्यंत उत्साहात पार पडले. एकेकाळी मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांमुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती सोसणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी गायकवाड यांचे हे दातृत्व एक मोठे वरदान ठरले असून, आता गावातील चिमुरड्यांना दर्जेदार वातावरणात ज्ञानार्जन करता येणार आहे.

एकेकाळी या जिल्हा परिषद शाळेची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती, ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत होते. ही वेदना ओळखून बिभीषणराव गायकवाड यांनी संपूर्ण खर्च उचलत केवळ शाळाच बांधली नाही, तर त्यात आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. या डिजिटल शाळेत पाच वर्गखोल्यांसह संगणक, प्रोजेक्टर, सीसीटीव्ही कॅमेरे, देखणे बोलके चित्र, सुसज्ज स्वच्छतागृह, स्वयंपाकगृह, हॉल, आकर्षक प्रवेशद्वार आणि खेळणी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या सोहळ्याला प्रशिक्षणार्थी शिक्षण अधिकारी मुळे, गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे, उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी आबासाहेब घायाळ आणि जनकल्याण बँकेचे अध्यक्ष उमेशराव कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विनायक आवाड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला, तर उपस्थित सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश गायकवाड व गावातील युवकांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामीण भागातील शिक्षणाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या या उपक्रमाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान यांनी तोंडभरून कौतुक केले. समाजात अशा प्रकारे दानशूर व्यक्ती पुढे आल्यास शासकीय शाळांची स्थिती निश्चित बदलेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर दुसरीकडे, आईचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना व्यक्त करताना बिभीषणराव गायकवाड भावुक झाले. आपल्या गावातील कष्टकऱ्यांच्या लेकरांना शहरासारख्या उत्तम सुविधा मिळाव्यात आणि समाजाचे ऋण फेडता यावे, याच भावनेतून ही शाळा उभारल्याचे त्यांनी अत्यंत नम्रपणे सांगितले. गायकवाड यांच्या या ऐतिहासिक आणि संवेदनशील पावलामुळे सुकळी गावाचे नाव संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाने घेतले जात आहे.



# आष्टी तालुका युवा पत्रकार संघातर्फे महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्स २०२६ सोहळ्याचे शनिवारी अहिल्यानगर येथे भव्य आयोजन

## आ.सुरेश धस,आ.संग्राम जगताप,आ.अक्षय कर्डीले,आ.काशिनाथ दाते,पोपट पवार,सुधा कांकरिया,महापौर ज्योती गाडे,उपमहापौर धनंजय जाधवसह आदी मान्यवरांची राहणार उपस्थिती



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, आष्टी (जि. बीड) यांच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्स २०२६ या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून समाजहित, शिक्षण, आरोग्य, अध्यात्म, पत्रकारिता, शेती, उद्योग, समाजसेवा, प्रशासन, क्रीडा, कला आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या सोहळयात राज्यस्तरीय सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी दिली.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा विशेष गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रांमध्ये निस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सावेडी, मनमाड रोड, अहिल्यानगर येथील हॉटेल मेघनंद लॉन्स अँड रेस्टॉरंट येथे संपन्न होणार आहे. या सोहळयाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून राज्याच्या विविध भागांतून मान्यवर, पुरस्कारार्थी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे राहणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले, आमदार काशिनाथ दाते, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेवक संपत बारस्कर, ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज, सुधाताई कांकरिया, रेश्माताई आठरे, स्वातीताई जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड्सच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रतिभावंत व्यक्तींना राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संघाचा प्रयत्न असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला प्रोत्साहन देणे हा या सन्मानाचा उद्देश आहे. विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांचा सन्मान केल्यामुळे समाजात प्रेरणादायी वातावरण निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या पुरस्कार सोहळ्यासाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल यांच्यासह समीर शेख, अक्षय विधाते, सोपान पगारे, अतुल जवणे, प्रेम पवळ, निसार शेख, राजेंद्र लाड, ड. किशोर निकाळजे, सय्यद बबलू, मनोज सातपुते, दादा पवळ, अमोल जगताप, अशोक कुताळ, आदिनाथ ठोंबरे, संतोष तांगडे, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, संस्कार लाड, सचिन पवार, सागर दळवी, संदीप हाडे आदी पत्रकार व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ पुरस्काराने होणार सन्मानित मान्यवर - यावर्षीच्या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये ह.भ.प. महंत काशीनाथ महाराज शास्त्री (अध्यात्मिक), ह.भ.प. समाधान महाराज नाडकर (अध्यात्मिक), सौ. सुशिला पवळ व श्री. रमेश पवळ (आदर्श पालक), सय्यद चाऊस (आदर्श कुस्तीपट्टू-महाराष्ट्र केसरी), डॉ. मुकुंद विधाते, डॉ. संदीप गाडे (आदर्श डॉक्टर), डॉ. महेश नाथ (आदर्श दंतवैद्य, समाजसेवक व नवउद्योजक), बद्रीनाथ जगताप (आदर्श प्रगतशील शेतकरी), परिवंत गायकवाड (आदर्श समाजसेवक), श्री अमोलक जैन प्रसारक मंडळ (आदर्श शैक्षणिक संस्था), सागर आमले (आदर्श सरपंच), गोरख तरटे (आदर्श कृषी अधिकारी), संतोष दाणी (आदर्श मुख्याध्यापक व समाजसेवक), बाळासाहेब भुकन (आदर्श गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर), भारती उर्फ सावित्री अनिल शेवते (आदर्श मानद वन्यजीव रक्षक), श्रीमती सुषमा प्रकाश राठोड (आदर्श उद्योजिका), भरत गळगटे (आदर्श प्रगतशील पशुपालन शेतकरी), अशोक सुदाम मुटकुळे (आदर्श युवा उद्योजक), बाळासाहेब बोडखे (उत्कृष्ट बांधकाम व्यवसायिक), अनिल आंधळे (आदर्श चार्टर्ड अकाउंटंट), प्रवीण वारे (आदर्श युवा उद्योजक), ड. रत्नदिप निकाळजे (आदर्श विधिज्ञ), संदीप शिंदे (आदर्श पशुवैद्यकीय अधिकारी), अवित घोलप (आदर्श बांधकाम इंजिनिअर), अशोक कोरडे (आदर्श प्राध्यापक), प्रेमकुमार तावरे (आदर्श मेडिकल युवा उद्योजक), बाबासाहेब पवार (आदर्श समाजसेवक शिक्षक नेता), सुखदेव पोकळे (दिव्यांग व अनाथालय पीडितग्रस्त आदर्श संस्था चालक), विजय मेहेर (आदर्श सोने-चांदी उद्योजक), सुभाष चौरे, सूर्यकांत नेटके (आदर्श पत्रकारिता), संतोष आमले (आदर्श संपादक), अजय कापरे (आदर्श समाजसेवक व उद्योजक), योगेश दाणी (आदर्श रुग्ण समाजसेवक), रवी सातसाई (आदर्श प्राध्यापक), सुधाकर राठोड (आदर्श मुख्याध्यापक), ड. विकास आजबे (आदर्श युवा विधिज्ञ), भगवान शिनगिरे (आदर्श समाजसेवक), विश्वनाथ राजाभाऊ खेंगरे (आदर्श ग्रामसेवक), शिवराज संजय सोले (उत्कृष्ट सेपाकटकॉ राष्ट्रीय खेळाडू), शहाजी कोकणे (आदर्श प्रगतशील शेतकरी), अतिक शेख (आदर्श एलआयसी सल्लागार), बबन शिंदे (आदर्श समाजसेवक), मोहसिन पठाण (आदर्श वाहन विमा सल्लागार), तुषार दिलीप नाथ (उत्कृष्ट इंटेरियर डिझायनर), संजय तुपे (आदर्श संगीत अलंकार), प्रीता प्रमोद नागरे (आदर्श बालकलाकार), राणी दरंदले (आदर्श निवेदिका), शहादेव पालवे (आदर्श पोलीस अधिकारी), डॉ. विष्णु साबळे (आदर्श पशुधन विकास अधिकारी), भाऊसाहेब विठ्ठल खाडे (आदर्श युवा उद्योजक) तसेच ह.भ.प. अशोक महाराज भोळे (आदर्श वारकरी भूषण) यांचा समावेश आहे.

या भव्य आणि प्रेरणादायी सोहळ्यास नागरिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच पुरस्कारार्थींचे हितचिंतक यांनी मोठ्या सख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याला सलाम करणारा हा सोहळा निश्चितच राज्यस्तरावर लक्षवेधी ठरणार असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.



आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी श्री.गोकुळ बागलाने यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन सत्कार करतांना कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामशेठ मधुरकर, सहाय्यक गटविकास अधिकारी ओंकार कदम, किरण शिनगीरे, हंबर्डे मामा आदी दिसत आहे.(छाया-एस.राजेंद्र लाड)

# विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांना महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ अंतर्गत आदर्श विधीज्ञ पुरस्कार जाहीर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) विधी व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकी जपत न्याय, जनजागृती आणि समाजसेवेच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे आष्टी येथील युवा व प्रसिद्ध विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ अंतर्गत आदर्श विधीज्ञ पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे आष्टी तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय, प्रेरणादायी आणि समाजहिताचे कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्काराने गौरव करण्यात येतो. शिक्षण, सामाजिक कार्य, प्रशासन, उद्योग, कृषी, आरोग्य, पत्रकारिता, कला, क्रीडा तसेच विधी क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान करण्यामागे नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण करण्याचा उद्देश आहे.



यंदाच्या पुरस्कारासाठी विधी व न्याय क्षेत्रात भरीव योगदान देणारे विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांची निवड करण्यात आली आहे. आपल्या व्यावसायिक कार्यासोबतच त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.

न्यायव्यवस्थेबाबत जनजागृती, गरजू नागरिकांना कायदेशीर मार्गदर्शन, युवकांना करिअरविषयक दिशा, रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान देत त्यांनी समाजात वेगळी छाप निर्माण केली आहे.

कायद्याचे ज्ञान समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक नागरिकांना न्याय मिळविण्याचा मार्ग सुकर झाला आहे. सामाजिक प्रश्नांवर संवेदनशील दृष्टीकोन ठेवून त्यांनी केलेले कार्य आणि समाजाशी असलेली बांधिलकी याची दखल घेत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने त्यांची आदर्श विधीज्ञ पुरस्कारासाठी निवड केली आहे.

विधिज्ञ रत्नदीप निकाळजे यांच्या या यशाबद्दल माजी आमदार भीमराव धोंडे, ज्येष्ठ विधिज्ञ बाबुराव अनारसे, उत्तम बोडखे, राजेंद्र धोंडे, राजेंद्र लाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, सहकारी आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील सामाजिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला अधिक व्यापक ओळख मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# ओडिसाचे दुग्ध व पशुसंवर्धन संचालक विजय कुलांगे यांच्या भुवनेश्वर निवासस्थानी माजी आ.भीमराव धोंडे व स्नेहीजनांची सदिच्छा भेट

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांच्या शिष्टमंडळाने नुकतीच जगन्नाथपुरी, कोणार्क आणि भुवनेश्वर या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची यात्रा पूर्ण केली. या यात्रेदरम्यान ओडिसा राज्याचे दुग्ध व पशुसंवर्धन विभागाचे संचालक तथा महाराष्ट्राचे सुपुत्र आयएएस विजय कुलांगे यांच्या भुवनेश्वर येथील शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट देण्यात आली. या भेटीमुळे महाराष्ट्र आणि ओडिसा यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक नातेसंबंध अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राळेगण म्हसोबा या गावचे सुपुत्र असलेले आयएएस विजय कुलांगे यांनी आपल्या प्रशासकीय कार्यकौशल्य, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख कामकाजाच्या बळावर ओडिसा राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत त्यांनी प्रशासनात उल्लेखनीय योगदान दिले असून, महाराष्ट्रातील अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.



भुवनेश्वर येथे झालेल्या या सदिच्छा भेटीत माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विजय कुलांगे यांच्या निवासस्थानी झालेल्या या भेटीदरम्यान विविध सामाजिक, शैक्षणिक, कृषी, ग्रामीण विकास आणि प्रशासनाशी निगडित विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातून गेलेल्या शिष्टमंडळाने कुलांगे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विजय कुलांगे यांनी ओडिसा राज्यात केलेल्या विकासात्मक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. दुग्ध व्यवसाय, पशुसंवर्धन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकरी हिताच्या योजनांबाबत त्यांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करण्यात आले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून आलेला एक युवक भारतीय प्रशासकीय सेवेत सर्वोच्च स्थान प्राप्त करून देशाच्या दुसऱ्या राज्यात प्रभावीपणे कार्य करत असल्याचा अभिमान उपस्थितांनी व्यक्त केला.

या सदिच्छा भेटीत आक्रूरशेठ कुदळे, दिलीप फरांदे, हरिचंद्र भुजबळ, धनंजय हिवरकर, प्रदीप गारटकर, किशोर फाले, रमाकांत मुंडे, बाळासाहेब भुकन, उत्तम बोडखे आणि संजय शेंडे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. सर्वांनी विजय कुलांगे यांच्याशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या कार्यपद्धतीविषयी जाणून घेतले.

यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी विजय कुलांगे यांचे कौतुक करताना सांगितले की, ग्रामीण भागातील युवकांनी जिद्द, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर देशातील सर्वोच्च प्रशासकीय सेवेत यश मिळवावे, यासाठी कुलांगे यांचे जीवन आणि कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी महाराष्ट्राची ओळख केवळ ओडिसामध्येच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर उंचावली आहे.

अत्यंत आपुलकीच्या, जिव्हाळ्याच्या आणि कौटुंबिक वातावरणात पार पडलेल्या या भेटीत जुन्या आठवणींनाही उजाळा देण्यात आला. महाराष्ट्रातून आलेल्या पाहुण्यांचे विजय कुलांगे यांनी मनापासून स्वागत केले. या भेटीमुळे उपस्थितांना प्रशासनातील सकारात्मक कामकाज, विकासाची दृष्टी आणि सार्वजनिक सेवेसाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जवळून ओळख झाली.

ओडिसा राज्यातील उच्च पदावर कार्यरत असूनही आपल्या मातृभूमीशी असलेली नाळ कायम जपणारे विजय कुलांगे हे महाराष्ट्राच्या कर्तृत्ववान प्रशासकीय परंपरेचे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि महाराष्ट्राशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली ही सदिच्छा भेट सर्वांच्या स्मरणात राहणारी ठरली. महाराष्ट्रातून गेलेल्या या शिष्टमंडळाने विजय कुलांगे यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्याविषयी अभिमानाची भावना व्यक्त केली.

# बसवराज पाटील यांच्या विजयासाठी आ.सुरेश धस यांची मतदारसंघभर तगडी फिल्डिंग

## ११ मतदान केंद्रांवर ठेवले बारकाईने लक्ष



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांच्या विजयासाठी लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांनी संपूर्ण मतदारसंघात प्रभावी निवडणूक व्यवस्थापन करत तगडी फिल्डिंग लावल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रचाराच्या प्रारंभापासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांनी स्वतः लक्ष घालत कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधत निवडणुकीची सूत्रे प्रभावीपणे हाताळली.

लातूर-बीड-धाराशिव या विस्तीर्ण मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांशी संपर्क साधणे, त्यांच्यापर्यंत महायुतीची भूमिका पोहोचविणे आणि उमेदवार बसवराज पाटील यांच्या विजयासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे या दृष्टीने आमदार सुरेश धस यांनी विशेष प्रयत्न केले. निवडणुकीपूर्व काळात त्यांनी बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांतील विविध नगरपंचायती, नगरपालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. या भेटीदरम्यान स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि महायुतीची भूमिका यावर चर्चा करत त्यांनी बसवराज पाटील यांच्या उमेदवारीसाठी पाठिंबा मिळविण्याचे काम केले.

निवडणुकीच्या प्रचारकाळात आ. धस यांनी विविध भागांत प्रचार दौरे काढून नगराध्यक्ष, नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच इतर लोकप्रतिनिधींशी थेट संवाद साधला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडून आलेल्या सदस्यांशी व्यक्तिगत संपर्क ठेवत त्यांनी महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांना प्रथम पसंतीचे मतदान करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या जनसंपर्क मोहिमेमुळे महायुतीच्या प्रचाराला मोठी गती मिळाल्याचे सांगितले जात आहे.

मतदानाच्या दिवशीही आ. सुरेश धस यांनी निवडणूक व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित केले. सकाळपासूनच त्यांनी मतदान प्रक्रियेचा आढावा घेण्यास सुरुवात केली. बीड जिल्ह्यातील सर्व ११ मतदान केंद्रांवर त्यांनी बारकाईने लक्ष ठेवत कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क साधला. प्रत्येक मतदान केंद्रावरील परिस्थिती, मतदारांची उपस्थिती, मतदानाचा वेग आणि आवश्यक समन्वय याबाबत ते सतत माहिती घेत होते.

विशेष म्हणजे, आष्टी विधानसभा मतदारसंघात सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत शंभर टक्के मतदान पूर्ण झाल्यानंतर त्यांनी स्वतः विविध मतदान केंद्रांना भेटी देण्यास सुरुवात केली. आष्टी, पाटोदा, बीड, केज, अंबाजोगाई यांसह विविध मतदान केंद्रांना भेट देत त्यांनी मतदान प्रक्रियेची पाहणी केली. मतदान शांततेत, पारदर्शक आणि सुरळीत पार पडावे यासाठी त्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आ. सुरेश धस यांनी उभारलेली निवडणूक यंत्रणा, बूथनिहाय नियोजन, कार्यकर्त्यांचा प्रभावी वापर आणि लोकप्रतिनिधींशी राखलेला सततचा संपर्क यामुळे महायुतीच्या प्रचाराला बळ मिळाले. निवडणुकीदरम्यान त्यांनी दाखविलेली तत्परता, शिस्तबद्ध नियोजन आणि संघटन कौशल्य याची राजकीय वर्तुळात विशेष चर्चा रंगली. निवडणुकीतील प्रत्येक टप्प्यावर स्वतः सक्रिय राहून त्यांनी नेतृत्वाची छाप उमटविली.

भाजप महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्या विजयासाठी आ. सुरेश धस यांनी घेतलेली मेहनत, केलेले सूक्ष्म नियोजन, व्यापक जनसंपर्क आणि मतदान केंद्रांवरील काटेकोर समन्वय यामुळे या निवडणुकीत त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी त्यांनी उभारलेली संघटनात्मक ताकद आणि दाखविलेली कार्यक्षमता राजकीय निरीक्षकांसह कार्यकर्त्यांमध्येही कौतुकाचा विषय ठरत आहे.

# लोकनेते आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली आष्टी,पाटोदा,शिरूर नगरपंचायतींमध्ये शंभर टक्के मतदान

लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुक

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत आष्टी, शिरूर कासार आणि पाटोदा नगरपंचायतींनी लोकशाहीच्या उत्सवात उल्लेखनीय सहभाग नोंदवत शंभर टक्के मतदानाचा मान मिळविला. लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली तिन्ही नगरपंचायतींतील लोकप्रतिनिधींनी मतदानाचा हक्क बजावत लोकशाही मूल्यांप्रती असलेली आपली निष्ठा आणि बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली.







या निवडणुकीत आष्टी नगरपंचायतीतील सर्व १९ पैकी १९ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावत शंभर टक्के मतदानाची नोंद केली. त्याचप्रमाणे शिरूर कासार आणि पाटोदा नगरपंचायतींतील सर्व पात्र मतदारांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली. तिन्ही नगरपंचायतींतील लोकप्रतिनिधींनी दाखविलेली ही एकजूट आणि लोकशाहीप्रती असलेली जागरूकता विशेष कौतुकास्पद मानली जात आहे.

लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणूक ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या निवडणुकीत नगरपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती सदस्यांना मतदानाचा अधिकार असतो. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण विभागाचे लक्ष लागून राहिले होते. अशा महत्त्वपूर्ण निवडणुकीत आष्टी, शिरूर कासार आणि पाटोदा नगरपंचायतींतील सर्व मतदारांनी जबाबदारीची जाणीव ठेवत मतदान केंद्रांवर वेळेत उपस्थिती लावली आणि मतदानाची प्रक्रिया सुरळीतरीत्या पूर्ण केली.

आष्टी नगरपंचायतीत सकाळीच सर्व सदस्यांनी मतदान करून आदर्श निर्माण केला. सकाळी नऊ वाजेपर्यंतच मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने निवडणूक प्रशासनानेही समाधान व्यक्त केले. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. संपूर्ण प्रक्रिया शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शिरूर कासार आणि पाटोदा नगरपंचायतींतील सदस्यांनीही त्याच उत्साहाने सहभाग घेत मतदानाची शंभर टक्के परंपरा कायम राखली. लोकशाही व्यवस्थेचा पाया मतदानावर आधारित असतो. प्रत्येक मताला असलेले महत्त्व लक्षात घेऊन तिन्ही नगरपंचायतींतील सदस्यांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. निवडणूक प्रक्रियेत दाखविलेली शिस्त, जबाबदारी आणि जागरूकता ही इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. लोकप्रतिनिधींनी स्वतः मतदानाचा आदर्श घालून दिल्याने लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक असलेली सकारात्मक मानसिकता अधिक दृढ झाल्याचे मत व्यक्त केले जात आहे.या निवडणुकीत लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली सर्व सदस्यांनी एकत्रितपणे मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिन्ही नगरपंचायतींतील सदस्यांनी लोकशाही मूल्यांना प्राधान्य देत मतदानाचा अधिकार बजावला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाही प्रक्रियेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे. तिन्ही नगरपंचायतींमध्ये शंभर टक्के मतदानाची नोंद झाल्यानंतर विविध स्तरांतून सर्व मतदारांचे अभिनंदन करण्यात येत आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आणि मतदान प्रक्रियेबाबत समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधींनी दाखविलेली मतदानाबाबतची जागरूकता ही लोकशाही सुदृढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या जबाबदार नेतृत्वाचे उदाहरण असल्याचेही सांगण्यात आले.लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण पर्वात आष्टी, शिरूर कासार आणि पाटोदा नगरपंचायतींनी नोंदविलेल्या शंभर टक्के मतदानामुळे या तिन्ही नगरपंचायतींचा गौरव वाढला असून भविष्यातील निवडणुकांसाठीही हा आदर्श मार्गदर्शक ठरणार आहे. लोकशाही मूल्यांप्रती असलेली निष्ठा, कर्तव्यभावना आणि जनप्रतिनिधींची जबाबदारी यांचे उत्कृष्ट दर्शन या मतदान प्रक्रियेत घडल्याने सर्वत्र समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तामसा ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी?

## दप्तर तपासणीमुळे विविध चर्चांना उधाण

तामसा, प्रतिनिधी : तामसा ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कारभाराबाबत प्राप्त झालेल्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने आज पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात दप्तर तपासणी केल्याची माहिती समोर आली आहे. या तपासणीमुळे तामसा परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तपासणीसंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी संबंधित विस्तार अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी फोन स्वीकारला नसल्याने दप्तर तपासणीचे नेमके कारण आणि चौकशीची व्याप्ती स्पष्ट होऊ शकली नाही.दरम्यान, मागील चार महिन्यांपासून तामसा ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकीय सरपंच पद रिक्त असल्याची चर्चा असून यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सरपंच पदाचा पदभार स्वीकारण्यास संबंधित व्यक्ती तयार नसल्याने ग्रामपंचायतीच्या अनेक प्रशासकीय कामांवर परिणाम होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

याच काळात ग्रामपंचायतीतील कर्मचारी व सफाई कामगारांनी विविध मागण्यांसाठी कामबंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरही चौकशी होणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. तसेच आंदोलनामागील कारणे, प्रलंबित प्रश्न आणि त्यावरील प्रशासनाची भूमिका याबाबतही स्पष्टता अपेक्षित आहे.

दुसरीकडे, हदगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडून या विषयावर अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीतील प्रशासकीय स्थिती, प्रलंबित प्रश्न, सरपंच पदाचा तिढा आणि कर्मचारी आंदोलन या सर्व बाबींची सखोल चौकशी होणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

तामसा ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत सुरू असलेल्या या घडामोडींमुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून प्रशासनाकडून लवकरच अधिकृत खुलासा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भोकर येथील शनी मंदिरात अधिक मासानिमित्त रसपोळी व धोंड्याचा महाप्रसाद कार्यक्रम उत्साहात संपन्न

भोकर तालुका प्रतिनिधी : साईनाथ बंडोड

भोकर : येथील शनी मंदिरामध्ये अधिक मासाच्या शेवटच्या दिवशी रसपोळी व धोंड्याच्या महाप्रसादाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज, नाणीजधाम यांच्या भक्तगण व सेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान भक्तांनी विविध सेवांमध्ये सहभाग नोंदवत धार्मिक कार्यात मोलाचे योगदान दिले.संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. शनिदेवांच्या दर्शनासाठी आणि महाप्रसादासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



या प्रसंगी भोकरचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी उपस्थित राहून कार्यक्रमास भेट दिली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली.या उपक्रमामुळे धार्मिक व सामाजिक एकोप्याला बळ मिळाले असून उपस्थित भाविकांनी आयोजकांच्या कार्याचे कौतुक केले.

## नांदेडच्या डॉ. नितेश घुंगरवार यांची पॅसिफ इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजी एंड सेल्फॉलॉजी ओडिशा येथे व्हिजिटिंग प्राध्यापकपदी नियुक्ती



नांदेड जिल्हा प्रतिनिधी नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र तथा कॉस्मोलॉजी विषयातील युवा संशोधक डॉ. नितेश गंगाधरराव घुंगरवार यांची पॅसिफ इन्स्टिटच्यूट ऑफ कॉस्मोलॉजी अँड सेल्फोलॉजी (झखउड), सागर, ओडिशा येथे व्हिजिटिंग प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. घुंगरवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील गणितीय शास्त्रे संकुलातून कॉस्मोलॉजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी हे संशोधन विद्यापीठाचे कुलसचिव तथा प्रख्यात संशोधक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

त्यांचे संशोधन कार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले असून त्यांनी जिनिव्हा विद्यापीठ (स्वित्झर्लंड), सोफिया विद्यापीठ (बल्गेरिया) आदी ठिकाणी आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर केले आहे. तसेच किंग साऊद विद्यापीठ (सौदी अरेबिया), अरिस्टॉटल युनिव्हर्सिटी (ग्रीस) आणि ठणऊछ युनिव्हर्सिटी (रशिया) येथील संशोधकांसोबत संयुक्त संशोधन करून नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत.

कॉस्मोलॉजी विषयातील संशोधनासोबतच त्यांनी सेल्फोलॉजी या नव्या संशोधन क्षेत्रातही कार्य सुरू ठेवले आहे. या क्षेत्रातील जागतिक ख्यातीचे संशोधक व जगातील अव्वल दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश असलेले डॉ. शिबेश कुमार जॅस पॅसिफ यांच्या सहकार्याने ते संशोधन करत आहेत. त्यांच्या संशोधन व शैक्षणिक योगदानाची दखल घेऊन पॅसिफ इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मोलॉजी अँड सेल्फोलॉजीने त्यांची व्हिजिटिंग प्राध्यापक म्हणून नियुक्ती केली आहे.या यशाबद्दल त्यांचे मार्गदर्शक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डी. पवार, प्राध्यापकवृंद, सहकारी संशोधक, घुंगरवार परिवार तसेच मित्रपरिवार

## तामसा ग्रामपंचायतीच्या वार्ड क्र. ५ मध्ये भीषण पाणीटंचाई; हजारो नागरिकांचे हाल

तामसा । प्रतिनिधी

तामसा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक ५ मध्ये सध्या भीषण पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकण्याची वेळ आली आहे. ग्रामपंचायतीकडून नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना रात्री-अपरात्री एका बोरवेलवर अवलंबून राहावे लागत आहे.



तामसा शहरातील सर्वात मोठा वार्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वार्डाची लोकसंख्या सुमारे पाच ते सात हजारांच्या दरम्यान आहे. एवढी मोठी लोकसंख्या असतानाही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. नागरिकांना घरगुती वापरासाठी तसेच पिण्यासाठी आवश्यक असलेले पाणी मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासक कार्यरत असून गावाचा कारभार संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे आहे. मात्र, नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या पाणीपुरवठा व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एका बोरवेलवर संपूर्ण परिसरातील नागरिकांची गर्दी होत असून पाणी भरण्यासाठी तासन्तास रांगा लागत आहेत. रात्री उशिरापर्यंत महिला, पुरुष व लहान मुले हातात बादल्या, कॅन आणि हंडे घेऊन पाण्याची प्रतीक्षा करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्यालगत पाणी भरताना अपघाताचा धोका निर्माण झाला असून नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून पाणी भरावे लागत आहे.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने अतिरिक्त टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची, बंद किंवा नादुरुस्त जलयोजना दुरुस्त करण्याची तसेच वार्ड क्र. ५ साठी स्वतंत्र आणि शाश्वत पाणीपुरवठा योजना राबविण्याची मागणी केली आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## आईच्या कष्टांचे चीज; आदिनाथ डोंगरेची एमएच-सीईटीमध्ये ९९.०१ पर्सेंटाईलसह घवघवीत यश

### वडिलांच्या निधनानंतरही खचला नाही; आदिनाथ डोंगरेने मिळवले एमएच-सीईटीमध्ये ९९.०१ पर्सेंटाईल

वडिलांचे छत्र हरवलेल्या आदिनाथ डोंगरेची अभूतपूर्व झेप; एमएच-सीईटीमध्ये ९९.०१ पर्सेंटाईल

किनवट (प्रतिनिधी) : तालुक्यातील बेल्लोरी धानोरा येथील विद्यार्थी आदिनाथ श्रीधर डोंगरे याने एमएच-सीईटी (अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा) मध्ये ९९.०१ पर्सेंटाईल गुण प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशामुळे परिसरातून त्याचे कौतुक होत आहे. आदिनाथ हा ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी असून त्याने इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे संपूर्ण शिक्षण स्थानिक स्तरावर पूर्ण केले. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लास किंवा खासगी शिकवणी न लावता केवळ जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर त्याने हे यश मिळवले आहे. आदिनाथ इयत्ता दहावीत असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यामुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले. घरातील आर्थिक परिस्थिती नाजूक असून शेती हेच कुटुंबाचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत आईने घेतलेल्या अथक परिश्रमांचे चीज आदिनाथने आपल्या यशातून केले आहे.



त्याच्या या यशामागे आईची मेहनत, त्याग आणि प्रेरणा महत्त्वाची ठरल्याचे बोलले जात आहे. भविष्यात राज्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन सक्षम अभियंता बनायचे आदिनाथ चे स्वप्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे हे यश प्रेरणादायी ठरत असून सर्व सुविधा उपलब्ध असूनही अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घेण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे. आदिनाथ डोंगरे यांच्या या यशाबद्दल आमदार भीमराव केराम, भाजप नेते सुधाकर भोयर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, ज्येष्ठ नेते सोपानराव केंद्रे, केंद्रीय जनजाती आयोगाचे गोवर्धन मुंडे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पुरसिंग राठोड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, विश्व हिंदू परिषदेचे अनिरुद्ध केंद्रे, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, शिवसेना तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे पाटील, माजी उपसभापती श्रीराम कांदे, प्रा. विभीषण पाळवदे, प्रा. गोवर्धन लांब, ड. रमण जायभाये, आत्माराम मुंडे पाटील, मुक्तीराम घुगे, युवा नेते ज्ञानेश्वर दहिफळे, संचालक संजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे श्यामसुंदर केंद्रे, रामदास फड, विवेक केंद्रे, विनायक मुसळे, समीर जायभाये, योगेश जायभाये यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. आदिनाथ च्या या यशामुळे बेल्लोरी धानोरा परिसरासह संपूर्ण किनवट तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सोमठाणा येथे तरुणाचा दगडाने ठेचून खून



भोकर तालुका प्रतिनिधी:साईनाथ बंडोड

भोकर तालुक्यातील मौजे सोमठाणा येथे दिवसाढवळ्या झालेल्या वादातून एका तरुणाचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना दि. १७ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, माळ सावरगाव - सोमठाणा तांडा रस्त्यावर झालेल्या वादानंतर ज्ञानेश्वर विठ्ठल पोलवाड (वय २८ वर्षे, रा. सोमठाणा) यांचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. या प्रकरणात हनमंतु रंगराव कोडगीरे यांनी हा खून केल्याचे सांगण्यात येत आहे.घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ उडाली. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एस. हाके यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलीसांकडून पुढील तपास सुरू असून, घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.या घटनेमुळे सोमठाणा परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## नांदेड विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ : किनवट येथे १०० टक्के मतदान

किनवट /प्रतिनिधी

नांदेड विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने किनवट तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर गुरुवारी शांततापूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. या मतदान केंद्रावरील सर्व ४१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावल्याने १०० टक्के मतदानाची नोंद झाली. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष तथा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक यंत्रणेने आवश्यक नियोजन केले होते. यावेळी मतदान अधिकारी चंद्रशेखर सहारे, मुकेश कोल्हे आणि अवधूत बोडखेवाड यांनी मतदानाची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. मतदारांची ओळख पडताळणी करण्यासाठी किनवट नगर परिषद येथील अधिकारी अल्ताफ गफुर शेख तसेच सेवक वैजयंता सोनकांबळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी मतदारांची ओळख निश्चित करून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गणेश कराड, दोन पोलिस उपनिरीक्षक आणि २३ पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. मतदान केंद्र परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक ठेवण्यात आल्याने मतदान प्रक्रिया कोणत्याही अडथळ्याविना पार पडली. निवडणूक प्रशासन, नगर परिषद कर्मचारी आणि पोलिस विभाग यांच्या समन्वयामुळे संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पूर्ण झाली. सर्व ४१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने किनवट मतदान केंद्राने १०० टक्के मतदानाची उल्लेखनीय नोंद केली असून, लोकशाही प्रक्रियेप्रती मतदारांनी दाखविलेल्या सजगतेचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

## येळेगावातील शेतकऱ्याची कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या

अर्धापूर (प्रतिनिधी) तालुक्यातील येळेगाव येथिल शेतकरी गुणाजी बापूराव पवार (वय ३९ वर्ष)यांच्या कडे बँकेचे पिक कर्ज व खाजगी फायनान्स कंपनीचे कर्ज होते तेकसे फेडायचे सततच्या नापिकीला व मुलींना शिक्षणाला लागणाऱ्या आर्थिक खर्चाला कंटाळून त्यांनी दिनांक १५ रोजी राहत्या घरी विषारी औषध प्राशन केले होते. त्यांच्यावर नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होता दिनांक १८ गुरूवारी रोजी सकाळी चार वाजता निधन झाले आहे.



शेतकरी गुणाजी पवार यांच्या पश्चात वडील,आई ,पत्नी, आणि ४ मुली आणि छोटा भाऊ असा परिवार आहे कपिल बापुराव पवार यांचे मोठे भाऊ होत

## गेवराई शहरातील प्रभाग क्रं ११ भाजपाच्या दोन्ही उमेदवारांना बहुमताने निवडून द्या :- नगरसेवक विजय मोटे

गेवराई (प्रतिनिधी)

शहरातील तय्यब नगर, शिक्षक कॉलनी , यशराज नगर येथिल प्रभाग क्रमांक ११ ची पोटनिवडणूक दिनांक २० जून रोजी होत असून येथिल भारतीय जनता पार्टीचे उमेदवार काझी सायमा आकेब व राहुल शंकरराव खंडागळे हे दोन उमेदवार उभा आहेत या दोन्ही उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन नगरसेवक विजय (मुन्ना) मोटे यांनी केले आहे.

मागिल काही महिन्यापूर्वी गेवराई नगर परिषदेसाठी निवडणूक झाली होती शहरातील नागरिकांनी माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित, बाळराजे दादा पवार व मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्यावर विश्वास दाखवत भारतीय जनता पार्टीला बहुमत देत सत्ता स्थापन करण्यात आली.

दरम्यान प्रभाग क्रमांक ११ ची पोटनिवडणूक दि २० जून रोजी होत असून २१ जून रोजी निकाल आहे तय्यब नगर भागात कायम भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व राहिले आहे येथिल नागरिकांनी कायम पवार कुटुंबावर विश्वास दाखवला आहे बाळराजे दादा पवार यांनी येथिल नागरिकांसाठी स्वतंत्र पाणी टाकी रस्ता नाली सह इतर सुविधा दिल्या आहेत. या भागातील अनखी मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्यासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार व मा.आ. लक्ष्मणराव पवार यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिलेले प्रभाग क्रं ११ अ चे उमेदवार काझी सायमा आकेब व प्रभाग क्रं ११ ब चे उमेदवार राहुल शंकरराव खंडागळे या दोन्ही उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन नगरसेवक विजय(मुन्ना) मोटे यांनी केले आहे.

